म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय ...........
दा. क्र. २९८२

१

# सागरातील अनमोल मोती

गो. काटकर

BVBK-0402982

बा.वा.
२९८२
३१।३।९८

# कथासरित्सागरातील

कथासागरातील

# अनमोल मोती

अनमोल मोती

## भाग नववा

भाग नववा

निवेदक

मा. गो. काटकर

म. सं. सं. ..., वाचनालय शाखा.
बाल साहित्य विभाग.
ग्रा. क्र. २९८२ दिनांक ३१।३।९८
विषय बा.वा. क्र. ........

कौस्तुभ प्रकाशन

नागपूर २२

BVBK-0402982

**प्रकाशक :**
शैलेश देशपांडे,
कौस्तुभ प्रकाशन,
२९/अ, नवनिर्माण सोसायटी,
राणा प्रतापनगर,
**नागपूर २२**

**मुद्रक :**
प्रभाकर धाक्रस,
सूर्य ऑफसेट,
रामदास पेठ,
**नागपूर १०**

© **सर्वाधिकार :**
मा. गो. काटकर
सोलापूर

**नवीन आवृत्ती :**
१५ ऑगस्ट १९९३

**मूल्य :**
**वीस रुपये**

## *निवेदन*

*कुमार मित्रांनो!*
*पंडित सोमदेव हा विलक्षण प्रतिभाशाली कवी होता. त्याने बृहत्कथेतून कथा-सरित्सागरात घेतलेल्या साडेतीनशेहून जास्त छोट्या मोठ्या कथांची मोठी बहारदार व चित्ताकर्षक गुंफण केलेली आहे. मानवी स्वभावाची विविधता दाखविणाऱ्या या नाना प्रकारच्या निवडक कथांचे संकलन या संग्रहात केले आहे. या महान कथासागरातील मनोरंजक व उद्बोधक कथा तुम्हास नक्कीच आवडतील असा विश्वास वाटतो.*

**- मा.गो. काटकर**

# कथाक्रम

१) सम्राट विक्रमादित्य ३
२) एका मृत्युंजयाची गोष्ट ३१
३) बुद्धीचे फळ ३५

वा. क्र. २९८१२ 39B.10
विषय

# सम्राट विक्रमादित्य

फार वर्षापूर्वी आपल्या भारताच्या अवंती देशात उज्जयिनी नावाचे एक वैभवसंपन्न नगर होते. त्या नगराच्या राजाचे नाव महेंद्रादित्य असे होते. महेंद्रादित्य शूर, देखणा व दानशूर होता. त्याच्या महाराणीचे नाव सौम्यदर्शना. राजाला पुत्रसुखाशिवाय सर्व प्रकारची सुखे होती. आपल्याला पुत्र व्हावा म्हणून तो महाराणीसह नाना प्रकारची व्रते करून मनोभावे शंकराची उपासना करू लागला.

त्या सुमारास देवेन्द्रासह सर्व देवांचा समुदाय कैलास पर्वतावर पार्वतीसह असलेल्या श्रीशंकराकडे आला. त्या सर्वांनी शंकराची प्रार्थना करून त्याला वंदन केले. तेव्हा संतुष्ट झालेल्या शंकरांनी त्यांना तेथे येण्याचे कारण विचारले. तेव्हा इंद्र म्हणाला, "देवाधिदेवा, आपण व भगवान विष्णूनी मारलेले दैत्य सध्या म्लेंच्छांच्या रूपाने पृथ्वीवर जन्माला आले आहेत. ते दुष्ट, सज्जन व धर्मनिष्ठ लोकांना मारतात, यज्ञांमध्ये विघ्ने आणून त्यांचा नाश करतात, मुनींचे आश्रम विध्वंस करतात, अशा प्रकारच्या भयंकर कृत्यांनी ते आपल्या भक्तांचा छळ करतात. तेव्हा आपण कृपा करून त्यावर काहीतरी उपाययोजना करावी. म्लेंच्छांचा समूळ नाश करून टाकील अशा एखाद्या महान वीराला पृथ्वीवर अवतार घेण्याची आज्ञा करावी."

अशी देवांची विनंती ऐकून महादेव त्यांना म्हणाले, "देवेन्द्रादि देवांनो, आपण सर्वांनी निश्चिंत मनाने स्वस्थानी जावे. पृथ्वीवर जो म्लेंच्छांचा अत्याचार चालला आहे त्याचे मी लवकरच निरसन करून टाकतो." असे महादेवाचे निश्चयी शब्द ऐकून इंद्रासह सर्व देव कैलासाहून आपापल्या स्थानाकडे निघून गेले. नंतर शंकरांनी माल्यवान नावाच्या आपल्या एका गणास बोलावून घेतले. ते त्याला म्हणाले, "वत्सा, दैत्यांनी म्लेंच्छांच्या रूपाने भूलोकी भयंकर अत्याचार चालविले आहेत. तेव्हा वैदिकी धर्माचा नाश

करणाऱ्या म्लेंच्छांचे पारिपत्य करण्यासाठी म्हणून तू उज्जयिनी नगराचा राजा महेंद्रादित्याचा पुत्र हो. माझ्या कृपाप्रसादाने तू सप्तद्वीपांचा सार्वभौम राजा होशील. यक्ष, राक्षस आणि वेताळ हे तुझी आज्ञा पाळतील. भूलोकावरील तुझे योग्य असे कार्य संपल्यावर पुन्हा तू माझा गण होऊन कैलासावर येशील.''

अशी शंकरांची आज्ञा ऐकून माल्यवान म्हणाला, ''प्रभो; आपली आज्ञा मला शिरसावंद्य आहे. आपल्या सेवेत येथे जे मला सुख लाभते तसे भूलोकावर कुठून असणार ? उलट तेथे प्रियजनांचा विरह, धननाश, त्रास, क्रोध, म्हातारपण असल्या भयंकर आपत्ती आहेत.'' ते ऐकून शंकर त्यास म्हणाले, ''वत्सा, तू निश्चिंतपणे तेथे जा. तुला तशा प्रकारची दुःखे बाधणार नाहीत. माझ्या कृपाप्रसादाने तू निरंतर सुखी व समाधानी राहशील.'' असे शंकरांनी सांगताच माल्यवान तेथून अदृश्य झाला. याच वेळी महेंद्रादित्याच्या निस्सीम उपासनेमुळे प्रसन्न झालेल्या शंकराने स्वप्नात दर्शन देऊन त्याला सांगितले, ''राजन्, तुझ्या एकनिष्ठ उपासनेमुळे मी संतुष्ट झालो आहे. लवकरच तुला पुत्र होईल, तो आपल्या पराक्रमाने सप्तद्वीपांचा सम्राट होईल. यक्ष, राक्षस, वेताळ त्याला वश होतील. तो स्वपराक्रमाने म्लेंच्छांचा नाश करील. त्याची विक्रमादित्य या नावाने ख्याती होईल. शत्रूच्या बाबतीत विषम भाव ठेवल्यामुळे तो विषमशील या नावानेही प्रसिद्ध होईल.'' त्याच रात्री महाराणी सौम्यदर्शना हिला देखील एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात शंकराने तिला दर्शन देऊन एक फळ दिले. ते वृत्त ऐकून राजाला अत्यानंद झाला.

नंतर यथावकाश सौम्यदर्शना राणीने एका अत्यंत तेजस्वी राजपुत्राला जन्म दिला. त्याच्या तेजाने महेंद्राचा राजप्रासाद प्रकाशित झाला. सर्व नगरभर आनंदाचा महोत्सव सुरू झाला. पुत्रजन्मामुळे राजाला आकाश ठेंगणे झाले. त्याने अपार द्रव्य दान केले. त्यामुळे नगरातील प्रत्येक नागरिक श्रीमंत झाला. राजाने मुलाचे बारसे मोठ्या वैभवाने साजरे करून शंकराच्या आज्ञेप्रमाणे त्याचे विक्रमादित्य व विषमशील असे नाव ठेवले. राजपुत्राच्या जन्माच्या वेळेसच सुमती नावाच्या राजमंत्र्याला महामती नावाचा पुत्र झाला. राजपुरोहिताला श्रीधर नावाचा मुलगा झाला. पुढे आपल्या समवयी मित्रांसह विक्रमादित्य दिवसेंदिवस वाढू लागला.

राजाने विद्याभ्यासासाठी विक्रमादित्याला गुरुगृही पाठविले. तेथे तो अल्पावधीतच नाना प्रकारच्या विद्या व कला यात प्रवीण झाला. शस्त्रास्त्रविद्येत तर तो चांगलाच निपुण झाला. असा विक्रमादित्य पुढे दिग्विजयासाठी गेला. त्याच्या शौर्याने प्रभावित झालेले राजे आपणहून त्याचे मांडलिक झाले. त्यांनी आपल्या सुस्वरूप मुली त्याला दिल्या. विक्रमादित्य पराक्रमी व राज्यकारभार कुशल झाला आहे, अशी खात्री झाल्यावर महेन्द्रादित्य राजाने त्याला राज्यभिषेक केला. आणि तो स्वतः सौम्यदर्शना राणीसह काशीला जाऊन शंकराची उपासना करीत तेथेच राहू लागला.

विक्रमादित्य आता सम्राट झाला होता. तो मोठ्या कौशल्याने राज्यकारभार करू लागला. प्रजाजनांवरील अन्याय दूर करून त्यांना सुख देऊ लागला. राजे लोकांना त्याचा मोठा दरारा वाटत होता. एवढेच नव्हे तर त्याच्या अंगी असलेल्या दिव्य शक्तीमुळे यक्ष, राक्षस, पिशाच्च, वेताळ, हे देखील त्याला भीत होते. वेळप्रसंगी तो त्यांनाही शासन करण्यास माघार घेत नसे. त्याने म्लेंच्छांचे पारिपत्य केले. जेव्हा एकादा राजा आज्ञापालन करीत नसे. तेव्हा त्याला ताळ्यावर आणण्यासाठी विक्रमादित्य आपल्या विक्रमशक्ती नावाच्या सेनापतीला ससैन्य त्याच्याकडे पाठवीत असे. अशाच एका प्रसंगी विक्रमशक्ती ससैन्य दक्षिणेकडे गेला होता. त्याची वार्ता जाणून घेण्यास उत्सुक असलेल्या विक्रमादित्याने आपला अनंगदेव नावाचा एक दूत पाठविला होता. तो आनंदित होऊन जेव्हा उज्जयिनी नगरास परत आला तेव्हा त्याने प्रथम राजाची भेट घेतली. आणि त्याचा जयजयकार केला. त्यावेळी राजाने त्या सेनापतीचे, त्याच्याबरोबर असलेल्या राजांचे, राजपुत्रांचे तसेच सैन्याचेही कुशल विचारले. तेव्हा अनंगदेव म्हणाला, ''महाराज, सर्वांचे क्षेमकुशल आहे. सेनापतींनी आता सर्व दक्षिण देश जिंकला आहे. म्लेंच्छांच्या टोळ्यांचा नाश केला. जे शरण आले त्यांना अभय दिले आहे. अशा प्रकारे विजयश्री प्राप्त करून महावीर सेनापती दोन दीन दिवसात नगराकडे परत येतील!''

असे मोठ्या आनंदाचे वृत्त ऐकून विक्रमादित्याने अनंगदेवाला वस्त्रे व भूषणे देऊन खूष केले. नंतर त्याच्याशी बोलण्याच्या ओघात राजाने त्याला विचारले, ''अनंगदेवा, तू आपल्या प्रवासात कोणकोणते देश पाहिलेस ? तुला

कुठे काही अद्‌भुत गोष्टी आढळल्या काय?" असे राजाचे शब्द ऐकून अनंगदेव म्हणाला, "महाराज, माझ्या एका प्रवासात खरंच एक अद्‌भुत प्रसंग घडून आला. तो मी तुम्हाला सांगणार होतोच. येथून निघाल्यानंतर सुखरूपपणे प्रवास करून मी सेनापती विक्रमशक्तींच्या शिबिरात जाऊन पोहचलो. तेथे त्यांची चतुरंग सेना एखाद्या समुद्राप्रमाणे सर्वत्र अफाट पसरलेली पाहून मी आश्चर्यचकित झालो. मी विक्रमशक्तीच्या शिबिरात काही दिवस राहिलो असताना एके दिवशी सिंहलेश्वराचा एक दूत तेथे आला आणि सेनापतींना म्हणाला, 'विक्रमशक्तीमहाराजं, सम्राट विक्रमादित्याचा एक खास दूत आपणाकडे आला आहे, असे आमच्या महाराजांस कळले आहे. काही शुभ राजकार्यासाठी त्या दूताला सिंहलद्वीपाला पाठवून द्यावे अशी त्यांनी आपणास विनंती केली आहे.'

ती विनंती मान्य करून सेनापतींनी मला त्या दूताबरोबर सिंहलद्वीपाकडे जाऊन येण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणे मी त्या दूताबरोबर नौकेतून जलप्रवास करीत सिंहलद्वीपास पोहचलो. त्या द्वीपाची राजधानी मोठ्या व उंच सुवर्ण प्रासादांनी शोभिवंत दिसत होती. अशा त्या नगरात भव्य सर्वसुखसंपन्न सिंहलेश्वर वीरसेन राहत होता तेथे जाऊन मी वीरसेन राजाची भेट घेतली. तेव्हा मोठ्या आनंदाने माझे स्वागत करून तो म्हणाला, 'अनंगदेवा, माझी अत्यंत लावण्यवती अशी मदनरेखा नावाची कन्या लग्नास योग्य झाली आहे. सम्राट विक्रमादित्य हेच तिला अनुरूप पती आहेत, आणि तीहि त्यांना अनुरूप अशी भार्या आहे. हे सांगण्यासाठीच मी तुला इथे बोलावून घेतले.'

असे म्हणून वीरसेनाने मदनरेखेला तिथे बोलावून घेतले. तिचे वस्त्रालंकारांनी युक्त असे लावण्य पाहून मी आश्चर्याने स्तंभित झालो. तेवढ्यात वीरसेन महाराजांनी मला विचारले, 'ही माझी कन्या मदनरेखा सम्राट विक्रमादित्यांना पसंत पडेल ना!' तेव्हा माझ्या तोंडून सहजच शब्द बाहेर पडले, 'खरोखरच आपली कन्या आमच्या महाराजांना अत्यंत अनुरूप असून त्यांना ती खासच पसंत पडेल.' असे माझे शब्द ऐकून आनंदित झालेले वीरसेन महाराज मला म्हणाले, 'अनंगदेवा; तू आता अपल्या महाराजांकडे जाऊन

त्यांना हे वृत्त सांग. तुझ्याबरोबर माझा एक दूत येईलच. तुम्ही पुढे जा. तुमच्या मागोमाग मी मदनरेखेला तिकडे पाठविण्याची योग्य ती व्यवस्था करतो.' असे म्हणून त्यांनी माझा सत्कार करून मला निरोप दिला.

नंतर मी हवलसेन नावाच्या सिंहल राजसेवकासह सिंहलद्वीपाहून परत येण्यास निघालो. आम्ही नौकेतून समुद्र पार करीत असता आम्हाला या जन्मात कधीही दृष्टीस न पडलेला असा एक फार मोठा अद्‌भुत चमत्कार आमच्या दृष्टीस पडला. प्रथम एकाएकी समुद्रातून वर आलेले एक वाळवंट आमच्या नजरेस पडले. त्याच्या मध्यभागी दोन अद्‌भुत मुली आम्हाला दिसल्या. त्यांच्यापैकी एक होती गोरी आणि दुसरी होती काळी. त्यांनी आपापल्या अंगकांतीस शोभून दिसतील असे वस्त्रालंकार घातले होते. त्यांच्यासमोर एक रत्नजडित सोन्याचे हरिण होते. त्याच्याबरोबर त्या मुली खेळत होत्या. ते अद्‌भुत दृश्य आम्ही डोळे विस्फारून पाहात स्वतःशी म्हणालो, 'किती अद्‌भुत हे दृश्य! आपण स्वप्नात तर नाही ना?'

असे आम्ही बोलत असताना एकाएकी समुद्रावर वादळ सुरू झाले. वाऱ्याला जोर चढला. त्यामुळे समुद्र खवळून गेला. त्या भयंकर वादळाने आमची नौका जोरजोराने डळमळू लागली आणि अखेर ती समुद्रातून वर आलेल्या एका खडकावर जोराने आपटून तिचे तुकडे तुकडे झाले. तेव्हा आमच्यासह नौकेत असलेले सर्वजण समुद्रात इकडे तिकडे फेकले गेले. आमच्या बरोबरच्या प्रवाशांना जलसमाधी मिळाली. आमचीही तीच गत होणार होती. पण त्या दोन कन्यांनी आमचे हात पकडून आम्हाला पाण्यातून वर काढून त्या वाळवंटावर नेले. समुद्र पाण्यात बुडून जाईल अशी आम्हाला भीती वाटत होती. पण प्राणसंकटातून वाचविणाऱ्या त्या मुलींनी आम्हाला अभय दिले. धीर दिला. आणि आमच्यासह एका गुहेत प्रवेश केला. तेव्हा एकामागून एक असे अनेक चमत्कार आमच्या नजरेस पडले. तेथे नाना प्रकारच्य वृक्षांनी व लतांनी भरलेले एक दिव्य वन आम्ही पाहिले. सर्वात मोठी आश्चर्याची गोष्ट अशी की, समुद्र, वाळवंट, त्या सुंदर मुली, ते रत्नजडित हरिण या आम्ही नुकत्याच पाहिलेल्या गोष्टी अदृश्य झाल्या होत्या. त्या वनातून पुढे जात आम्ही एका सरोवरापाशी पोहोचलो. ते अत्यंत निर्मळ असे सरोवर मधुर

पाण्याने भरलेले होते. तेवढ्यात साक्षात वनश्रीसारखी दिव्य स्त्री परिवारासह स्नानार्थ त्या सरोवराकाठी आली. तिने सरोवरात प्रवेश करून त्यातील काही ताजी कमळे तोडली. नंतर स्नान करून तिने शंकराचे ध्यान केले. तो काय आश्चर्य ! त्या सरोवराच्या पाण्यातून एक तेजस्वी शिवलिंग तिच्यासमोर आले. तिने त्या शिवलिंगाला आपल्या हातातील ताजी कमळे वाहून त्याचे पूजन केले. नंतर थोडावेळ वीणेवर गाऊन तिने त्या शिवलिंगाचे विसर्जन केले. त्याबरोबर ते पुन्हा सरोवरातील पाण्यात अदृश्य झाले. नंतर ती दिव्य स्त्री आपल्या परिवारासह तेथून आपल्या गृहाकडे जाऊ लागली.

ती दिव्य स्त्री कोण आहे, हे जाणून घेण्यासाठी आम्ही फार उत्सुक झालो होतो. म्हणून आम्ही तिच्या मागोमाग जाऊन तिच्या परिवारातल्या दासींना विचारले. पण आमच्या प्रश्नाचे कोणीही उत्तर दिले नाही. तेव्हा वीरसेन राजाच्या दूतास आपला प्रभाव दाखवावा या हेतूने त्या दिव्य स्त्रीलाच ऐकू जाईल अशा आवाजात म्हणालो, 'हे कल्याणी, तू कोण आहेस ? हे मला न सांगता एक पाऊल पुढे टाकशील तर तुला सम्राट विक्रमादित्यांची शपथ आहे !' असे माझे मोठ्यांदा उच्चारलेले शब्द ऐकताच ती थबकून उभी राहिली. मी तिच्याजवळ जाताच ती आपल्या परिवारापासून पुढे येऊन मला म्हणाली, 'खरं सांगायचं म्हणजे विक्रमादित्यांचं कुशल कळावं म्हणूनच मी मायाजाल निर्माण करून तुला या ठिकाणी आणलं आहे. विक्रमादित्यांनी मी महाभयंकर संकटात असतांना मला मदत केली, मी कोण ? आणि विक्रमादित्याला मी पूज्य का मानते ते मी घरी गेल्यावर तुला कथन करीन.' असे म्हणून त्या दिव्य स्त्रीने आम्हाला एका रमणीय नगरात नेले. ती खरोखर सुवर्णनगरीच होती. त्या नगरीतील एका रत्नजडित प्रसादात आम्ही प्रवेश केला. तिथे त्या दिव्य स्त्रीने आमचे मोठे आनंदाने आदरातिथ्य केले. सुग्रास असे भोजन झाल्यानंतर थोडी विश्रांती घेऊन आम्ही त्या दिव्य स्त्रीच्या भेटीस गेलो.

ती एका खास महालात आपल्या सख्यांचा मेळाव्यात बसली होती. आम्ही तिथे येताच तिने बाजूस असलेल्या रत्नजडित आसनावर बसण्याची आम्हास विनंती केली. आणि ती आपली हकीकत सांगू लागली. ती म्हणाली, 'अनंगदेवा, मी दुदुंमी नावाच्या एका यक्ष राजाची मुलगी आहे. माझं नाव

मदनमंजिरी. कुबेराचा भाऊ मणिभद्र यांची मी पत्नी. मी आपल्या पतीसह नेहमीच नंदीच्या तीरावर किंवा पर्वतमाथ्यावर किंवा कधी प्रफुल्लित उपवनात विहार करण्यासाठी जात असे. एके दिवशी मी मणिभद्रासह उज्जयिनी नगरातील मकरंद नावाच्या एका उपवनात विहार करण्यास गेले होते. तेथे एका दुष्ट मांत्रिकाने मला पाहिले आणि मला वश करण्याकरिता स्मशानात जाऊन होमहवन करायला सुरुवात केली. त्या नीचाचे दुष्ट कृत्य मला आपल्या विद्येने कळले आणि ती गोष्ट मी मणिभद्रास सांगितली. तेव्हा त्यांनी ते आपल्या थोरल्या भावाला म्हणजे कुबेराला सांगितले. कारण मंत्रात विलक्षण शक्ती असल्याने मी त्रिभुवनात कुठेही लपून बसले असते तरी त्या मांत्रिकाने मला आपल्याशी ओढून आणले असते. म्हणून या संकटातून माझी सुटका कशी होईल असे कुबेराने ब्रह्मदेवाची प्रार्थना करून त्यांना विचारले, तेव्हा ब्रह्मदेव म्हणाले, 'तो दुष्ट मांत्रिक तुझ्या भावजयीचे हरण करण्याचा प्रयत्न करीत आहे. ही गोष्ट सत्य आहे. मंत्राचं सामर्थ्य विलक्षण असतं. तेव्हा त्या सामर्थ्याच्या बळावर तो दुष्ट मदनमंजिरीला आकर्षित करू लागला की तिने सम्राट विक्रमादित्याचा धावा करावा. तो आपल्या विलक्षण सामर्थ्याने त्या संकटातून तिची सुटका करील!'

पुढे काही दिवसांनी त्या दुष्ट मांत्रिकाचे होमहवन पूर्ण होऊन सिद्ध झालेल्या मंत्राने तो मला आपल्याकडे आकर्षित करू लागला. तेव्हा अत्यंत भयग्रस्त झालेली मी त्या मंत्राच्या प्रभावाने स्मशानाकडे खेचले गेले. त्यावेळी मी प्रसंगावधान बाळगून ब्रह्मदेवानी सांगितल्याप्रमाणे मनोभावे विक्रमादित्याचा धावा केला. मी म्हणाले, 'हे राजा विक्रमादित्या, लवकर धावत ये व या दीन ललनेचं रक्षण कर. मी दुदुंभी यक्षाची मदनमंजिरी नावाची कन्या असून कुबेराच्या धाकट्या भावाची पत्नी आहे. हा दुष्ट माझं हरण करीत आहे. तेव्हा वीरश्रेष्ठा, लवकर धावत ये. आणि या दुष्टाच्या हातून माझी मुक्तता कर!'

असे मी मोठ्यांदा म्हणत आहे तोच हातात तलवार घेतलेले विक्रमादित्य माझ्याकडे त्वरेने येत असलेले मला दिसले. ते जवळच येताच मला म्हणाले, 'हे सुंदरी, घाबरू नकोस. माझ्या राज्यात अधर्माचरण करण्यास प्रवृत्त

झालेल्या अशा त्या दुष्ट मांत्रिकाला मी आताच योग्य शासन देतो.' असे म्हणून त्याने तत्काळ अग्निशिख नावाच्या एका वेताळाला आमंत्रण केले. त्या क्षणी जळजळीत डोळ्याचा व उंच डोक्याचा असा धिप्पाड अग्निशिख तेथ प्रकट झाला. आणि त्याने राजाला विचारले, 'महाराज, काय आज्ञा आहे ?' तेव्हा राजाने त्याला आज्ञा केली, 'अग्निशिखा, परस्त्रीचे अपहरण करणाऱ्या या दुष्ट मांत्रिकाला तू मारून खा !'

असे राजाचे शब्द ऐकताच अग्निशिखाने भयंकर रूप धारण केले. ते दृश्य नजरेस पडताच तो मांत्रिक जिवाच्या भीतीने पळत सुटला. पण वेताळाने त्याचा पाठलाग करून त्याला पकडले. आणि जोराने गरगर फिरवून जमिनीवर आपटले. त्याबरोबर त्या दुष्ट मांत्रिकाचा देह छिन्नविछिन्न झाला. अशा प्रकारे सम्राट विक्रमादित्यांनी मला फार मोठ्या अशा प्राणसंकटातून वाचविले. अनंगदेवा, यापुढे काय झाले ते तुला सांगते. ते तू ऐक.' असे म्हणून मदनमंजिरी थोडा वेळ थांबून पुढे बोलू लागली.

'अग्निशिखाने, त्या दुष्ट मांत्रिकाला मारल्यानंतर त्याचे मांस भक्षण करण्यासाठी तिथे अनेक भुते गोळा झाली. त्यांच्यात यमशिख या नावाचा एक वेताळ होता. तो पुढे येऊन त्या दुष्ट मांत्रिकाचे शरीर उचलू लागला. तेव्हा अग्निशिख रागाने त्याला म्हणाला, 'अरे मूर्खा, सम्राट विक्रमादित्याने याला मारून खाऊन टाक अशी मला आज्ञा केली आहे. तेव्हा तू याला हात लावशील तर याचा परिणाम बरा होणार नाही.' असे अग्निशिखाचे शब्द ऐकून यमशिख उपहासाने म्हणाला, 'एवढं काय सामर्थ्य आहे विक्रमादित्याचं, की ज्याच्या आज्ञेचं पालन आम्ही केलंच पाहिजे !' तेव्हा अग्निशिख त्याला म्हणाला, 'अरे तुला माहित नाही. विक्रमादित्याचे सामर्थ्य फार मोठे आहे. त्या संबंधी तुला एक गोष्ट सांगतो. ती तू ऐक म्हणजे तुझी खात्री होईल !'

असे म्हणून अग्निशिख ती गोष्ट सांगू लागला. 'या नगरात डाकिनेय नावाचा एक अट्टल जुगारी राहात होता. एकदा इतर जुगाऱ्यांनी कपट करून जुगारात त्याचे सर्व द्रव्य हरण केले. तरीसुद्धा त्याचेकडून काही द्रव्य येणे राहिले होते. ते द्यायला डाकिनेयाजवळ एक कवडीही शिल्लक राहिली नव्हती त्यामुळे त्या जुगाऱ्यांनी त्याला बांधून काठ्यांनी खूप झोडपले. बिचारा डाकिनेय तेवढा

भयंकर मार सहन करीत एखाद्या पुतळ्यासारखा स्वस्थ उभा राहिला. तेव्हा इतका मार खाऊनही हा जिवंत राहिला तर कदाचित् आपला सूड उगवील अशी भीती वाटून त्या दुष्ट जुगाऱ्यांनी त्याला अरण्यातील एका खोल विहिरीत टाकून दिले. तो विहिरीच्या तळाशी पडताच तेथे असलेले दोन भयंकर ब्रह्मराक्षस त्याला खाण्यास पुढे झाले. त्यांना पाहताच जखमी झालेला डाकिनेय या नवीन प्राणसंकटाच्या भीतीने थरथर कापू लागला. तेव्हा त्यांनी सौम्य शब्दात 'तू कोण व इथे कसा आलास?' असे त्याला विचारले. तेव्हा डाकिनेयाने त्यांना आपली सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून ते डाकिनेयाला म्हणाले, 'आम्ही या खोल विहिरीत असण्याचे कारण म्हणजे एका निरपराध ब्राह्मण कन्येला झपाटण्याचा आम्ही अपराध केला. म्हणून सम्राट विक्रमादित्याने आपल्या सामर्थ्याने आम्हाला वर्षभर इथेच राहण्याचे शासन केले. आजपासून आठ दिवसांनी आमचा इथे राहण्याचा अवधी संपेल. नंतर आम्हाला मुक्तता मिळेल. तोपर्यंत तू आम्हास दररोज काही खाद्यपदार्थ देण्याचे मान्य करशील तर या भयंकर विहिरीतून आम्ही तुझी मुक्तता करू. पण लक्षात ठेव. विहिरीबाहेर पडल्यावर तू आपले वचन पाळले नाहीस तर आम्ही मुक्त होताच तुला खाऊन टाकू!'

जिवंत राहण्याच्या आशेने डाकिनेयाने त्यांचे म्हणणे मान्य करताच त्या ब्रह्मराक्षसांनी त्याला विहिरीतून वर फेकले. विहिरीतून बाहेर पडल्यावर त्या ब्रह्मराक्षसांना हवे असलेले खाद्य कोठून व कसे मिळवावे असा डाकिनेयाला प्रश्न पडला. पुष्कळ वेळ विचार केल्यानंतर त्याला एक उपाय सापडला. त्याप्रमाणे तो स्मशानात गेला आणि तेथील एक प्रेत खांद्यावर घेऊन तो हिंडू लागला. त्यावेळी मी भुकेला असल्यामुळे मी त्याच्यापाशी गेलो. आणि त्याला विचारले, 'या शवाची किंमत तू काय घेणार?' तेव्हा तो धूर्त म्हणाला, 'तू मला फक्त तुझे रूप व सामर्थ्य दे. मला दुसरे काही नको. त्याची मुदत फक्त सात दिवसापुरती असावी. आठव्या दिवशी तुझे रूप व सामर्थ्य मी तुला परत देईन.' 'ते तुला कशासाठी हवे आहे? असे मी त्याला विचारले, तेव्हा त्याने मला आपली करुण कहाणी सांगितली. तेव्हा त्याला माझे रूप व सामर्थ्य सात दिवसांच्या मुदतीने दिले.

त्याचा उपयोग करून त्या डाकिनेयाने ज्यांनी आपणास मरेपर्यंत मार देऊन खोल विहिरीत टाकून दिले, त्या जुगाऱ्यापैकी प्रत्येकाला डाकिनेयाने रोज ओढून नेऊन ब्रह्मराक्षसाला खाद्य म्हणून विहिरीत टाकून दिले. सात दिवस पूर्ण होताच डाकिनेयाकडून मी माझे रूप व सामर्थ्य परत घेतले. आठव्या दिवशी मरणाच्या भीतीने तो माझी विनवणी करीत मला म्हणाला, 'मित्रा, वचन दिल्याप्रमाणे मी ब्रह्मराक्षसाला सात दिवस नियमितपणे खाद्य दिले. आता आजचा दिवस मला ते कार्य करायचं आहे. आज जर मी त्यांना खाद्य पुरविले नाही तर उद्या ते विहिरीबाहेर पडताच मला खाऊन टाकतील. तेव्हा यातून मार्ग काढण्यास तू मला सहाय्य कर.' असे डाकिनेयाचे करुण शब्द ऐकून मला त्याची दया आली. मी त्याला म्हणालो, 'कोठे आहेत ते ब्रह्मराक्षस ते तू मला दाखव, म्हणजे मीच त्यांना खाऊन टाकतो. म्हणजे तुला त्यांची भीती उरणार नाही.'

असे माझे शब्द ऐकून डाकिनेयाला फार आनंद झाला. आणि धन्यवाद देत तो मला विहिरीकडे घेऊन निघाला. तिथे जाताच मी विहिरीच्या काठावरून आत डोकावून पाहात असताच त्या कपटी व कृतघ्न डाकिनेयाने मला त्या विहिरीत ढकलून दिले. मी आत पडताच नेहमीप्रमाणे आपले खाद्य आले असे समजून ते दोघे ब्रह्मराक्षस मला खाण्यासाठी पुढे धावून आले. तेव्हा मी चटकन् मला सावरून मोठ्या आवेशाने त्या दोघांशी बाहुयुद्ध करू लागलो. त्यात त्यांचा मी पराभव केला. तेव्हा नम्र होऊन त्यांनी माझी चौकशी केली. तेव्हा डाकिनेय भेटल्यापासूनची सर्व हकीकत मी त्यांना सांगितली. ती ऐकून ते म्हणाले, 'त्या विश्वासघातकी जुगाऱ्यानं आपण सर्वांना चांगलेच बनविलेले दिसते. जुगाऱ्यावर कोणीही विश्वास ठेऊ नये हेच खरं.' असे म्हणून त्या ब्रह्मराक्षसांनी माझ्याशी मैत्री जोडून मला निरोप दिला.

नंतर मी त्या खोल विहिरीतून बाहेर आलो तेव्हा मला फार भूक लागल्याची जाणीव झाली. म्हणून मी तसाच भटकत रात्रीच्या वेळी उज्जयिनी नगराजवळ आलो. तिथे एका मार्गावरून जात असता मला एक वाटसरू दिसला. त्याबरोबर त्याला खाण्याकरिता मी पुढे धावलो. मी त्याला पकडताच तो विक्रमादित्याचा धावा करू लागला. तेव्हा ज्याचे डोळे रागाने लाल झाले

आहेत असा विक्रमादित्य तिथे प्रकट झाला. आणि मला म्हणाला, 'अरे दुष्टा, या गरीब वाटसरूला विनाकारण मारू नको.' असे म्हणू त्याने मला दूर ढकलून दिले. पण मी चटकन् उठून पुन्हा त्याच्याशी दांडगाई करण्यास तयार होत आहे, असे दिसताच त्या राजाने लगेच जमिनीवर एका पुरुषाचे चित्र काढले. आणि आपल्या हातातील तलवारीने त्याच्या मानेवर प्रहार केला. आश्चर्याची गोष्ट अशी की तो प्रहार माझ्या मानेवर होऊन तिथे जखम झाली आणि तिच्यातून रक्त वाहू लागले. राजाचे असे अद्‌भुत सामर्थ्य पाहून मी अतिशय भ्यालो. आणि अखेर त्याला शरण जाऊन त्याच्या पायावर माझे डोके ठेवले. त्या महाशूर व दयाळू राजाने मला प्राणदान दिले. म्हणूनच मी आता त्याचा सेवक झालो आहे. त्या महावीराच्या आज्ञेने त्या दुष्ट मांत्रिकाला मी मारले आहे. म्हणून तो माझे भक्ष्य आहे. तेव्हा, यमशिखा, बऱ्या बोलाने तू मुकाट्याने येथून चालता हो!'

पण जेव्हा अग्निशिखाचे म्हणणे यमशिख धुडकावून लावू लागला, तेव्हा अग्निशिखाने विक्रमादित्याचे स्मरण केले. तेव्हा तिथे प्रकट झालेल्या विक्रमादित्यांनी भूमीवर एक मनुष्याकृती काढून आपल्या हातातील खड्‌गाने तिचा एक हात तोडला. त्याबरोबर इकडे यमशिखाचाही हात तुटून पडला. ते पाहून भयभीत झालेला दुष्ट यमशिख तेथून पळून गेला.' अशी समक्ष पाहिलेली विक्रमादित्य राजाच्या अद्‌भुत प्रभावाची हकीकत मदनमंजिरीने अनंगदेवाला सांगून ती थोडा वेळ थांबली. नंतर ती पुढे म्हणाली, 'अनंगदेवा, अशा प्रकारे त्या महावीर व महादयाळू राजाने माझ्यावर फार मोठा उपकार केला आहे. त्याची कशी फेड करावी याची मला नेहमी चिंता लागून राहिली आहे. पण माझ्या विद्येच्या प्रभावाने आता मला एक वार्ता समजली आहे.

सिंहलद्वीपाच्या राजाकडून येणाऱ्या मदनरेखेचे हरण करण्याचे कारस्थान सैन्यातील काही राजांनी रचले आहे. त्यासाठी सेनापती विक्रमशक्तीलाही ठार करण्याचा त्यांचा बेत आहे. तेव्हा अनंगदेवा, तू आता ताबडतोब विक्रमशक्तीकडे जा. आणि त्याला हे वृत्त सांगून सावध कर. मी देखील त्याला या कामी यश येईल अशी व्यवस्था करीन. ही गुप्त गोष्ट सांगण्यासाठी मी तुम्हाला माझ्या मायेने इथे आणलं आहे. सम्राट

विक्रमादित्यांना मी लवकरच योग्य अशी भेट धाडणार आहे.'

मदनमंजिरीचे असे बोलणे संपताच आम्ही प्रथम पाहिलेल्या त्या दोन अद्‌भुत कन्या आपल्या सुवर्णमृगाला घेऊन तिथे आल्या. त्यांच्याबद्दलचे व त्यांच्या सोन्याच्या हरिणाबद्दलचे वृत्त जाणून घेण्याची मला उत्सुकता होती. म्हणून मी मदनमंजिरीला विचारले, 'देवी, या कन्या कोण आहेत ? आणि त्यांच्याजवळ असलेले सोन्याचे हरिण जिवंत कसे ?' असे माझे शब्द ऐकून मदनमंजिरी म्हणाली, 'त्यांची हकीकत तशी विलक्षणच आहे. ब्रह्मदेव प्रज्ञा निर्माण करीत असतांना त्याला विघ्न करण्यासाठी म्हणून देवाना अजिंक्य असलेले घट व निघंट असे दोन राक्षस आले. तेव्हा त्यांचा नाश करण्यासाठी ब्रह्मदेवाने या दोन सुखरूप कन्यांना निर्माण केले. त्यांना पाहून मोहित झालेले ते राक्षस एकमेकाशी लढून नाश पावले. नंतर ब्रह्मदेवाने या कन्या कुबेराच्या स्वाधीन केल्या. आणि त्याला सांगितले, 'त्यांना योग्य असा पती प्राप्त करून द्या !' कुबेराने त्या आम्हास दिल्या. आणि आम्ही त्यांना सम्राट विक्रमादित्य हाच अनुरूप पती आहे, असे निश्चित केले आहे.

या कन्यांप्रमाणे सोन्याच्या हरिणाची हकीकतही मोठी मजेदार आहे. इंद्राने आपल्या लाडक्या मुलासाठी म्हणून विश्वकर्म्याकडून एक सोन्याचे हरिण तयार करून घेतले. पुढे एकदा रावणाच्या इंद्रजित नावाच्या मुलाने युद्धात इंद्राचा पराभव करून त्याच्यापाशी असलेल्या अद्‌भुत वस्तू बरोबर त्या सोन्याच्या हरिणालाही लंकेला नेले. पुढे सीताहरण केल्याबद्दल रागावून रामाने रावणाला मारले. लक्ष्मणाने इंद्रजिताचा वध केला. नंतर ते सोन्याचे हरिण बरेच दिवस लंकेच्या गादीवर बसलेल्या बिभीषणाकडेच होते. पुढे एका उत्सवाच्या वेळी बिभीषणाने आम्हाला लंकेला आमंत्रित केले होते. उत्सव संपल्यावर आम्ही त्याचा निरोप घेताना त्याने ते सोन्याचे हरीण आम्हाला भेट म्हणून दिले. तेव्हापासून ते माझ्याकडेच आहे. या दिव्य कन्यांच्या बरोबर हे अद्‌भुत सोन्याचे हरिणही सम्राट विक्रमादित्यांना भेट म्हणून द्यावे असे मी ठरविले आहे.'' असे मदनमंजिरी सांगत असता सूर्यास्त झाला. तेव्हा आम्ही संध्यावदन केले. व एका महालात झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी भल्या सकाळी जेव्हा आम्हाला जाग आली तेव्हा

आपण विक्रमशक्तीच्या शिबिरात आहोत असे आम्हास आढळले. नंतर मदनमंजिरीनी सांगितलेले राजांच्या कारस्थानाचे वृत्त मी त्वरेने जाऊन विक्रमशक्तीला सांगितले. सिंहलेश्वराचा निरोप मी त्याला सांगणार तेवढ्यात यक्षसैन्यासह त्या दोन कन्या सुवर्णमृगासह तेथे आल्या. तेव्हा भूतपिशाच्च्यांच्या मायेची शंका विक्रमशक्तीला आली. म्हणून मी त्याला आतापर्यंत घडलेला सर्व वृत्तांत सांगितला. मग विक्रमशक्तीने या दोन कन्यांचे उचित असे स्वागत केले. नंतर शत्रूला तोंड देण्यासाठी आपले सैन्य सज्ज केले. थोड्याच वेळात कारस्थानात सामील झालेल्या राजांनी आपल्या सैन्यावर निकराचा हल्ला केला. तेव्हा आपल्या सैन्याबरोबर त्या कन्यांना पोहोचविण्यास आलेल्या यक्ष सैन्यानीही शत्रू सैन्याचा जोरदार प्रतिकार केला. मोठे घनघोर युद्ध झाले आणि अखेर शत्रूचा पराभव झाला. कटात सामील झालेले राजे आणि इतर वीर यांचा नाश झाला. काही शत्रू सैन्य पळून गेले. आणि उरलेले शरण आले. नंतर मदनमंजिरी आपल्या पतीसह तेथे येऊन विक्रमशक्तीला म्हणाली, "महावीरा, माझ्या हातून आपल्या प्रभूची जी अल्प सेवा झाली ती त्यांना कृपा करून कथन करा. आणि या दिव्य कन्यांशी विवाह करून आम्हाला उपकृत करा अशी माझी विनंती त्यांना सांगा. तसेच हे सोन्याचे हरिण मी त्यांना भेट म्हणून दिलं आहे !" एवढे बोलून मदनमंजरी आपला पती व परिवार यांच्यासह अदृश्य झाली.

दुसऱ्या दिवशी सिंहलेश्वर कन्या मदनलेखा आपल्या परिवारासह. तिथे आली. तेव्हा विक्रमशक्तीने पुढे जाऊन तिचे मोठ्या आदराने व सन्मानाने स्वागत केले. नंतर त्या सर्वांना बरोबर घेऊन तो विजयी महावीर आता दोन तीन दिवसातच नगराजवळ येईल. हे आनंदाचे वृत्त आपणास समक्ष सांगण्याकरिताच मी पुढे आलो आहे."

अशी अनंगदेवाकडून सर्व वार्ता समजल्यावर विक्रमादित्याला फार आनंद झाला. नंतर दुसऱ्या दिवशी तो आपल्या परिवारासह विजयी विक्रमशक्तीचा सन्मान करण्याकरिता नगरातून बाहेर पडला. राजा आपल्या सत्कारार्थ समक्ष आला आहे हे पाहताच विक्रमशक्ती मोठ्या उत्कंठेने पुढे झाला. आणि त्याने मोठ्या नम्रतेने राजाच्या पायावर आपले डोके ठेवले. तेव्हा

विक्रमादित्याने त्याला मोठ्या प्रेमाने उठवून आलिंगन दिले. त्या दिवशी मार्गातच सैन्याने मुक्काम केला. तिथेच दरबार भरवून विक्रमादित्याने सर्वांचा यथायोग्य सन्मान करून सिंहलेश्वर कन्या, तसेच सोन्याचे हरिण या सर्वांचा त्याने स्वीकार केला. नंतर त्या सर्वांच्या बरोबर विक्रमादित्याने नगरप्रवेश केला.

पुढे काही दिवसांनी एका शुभमुहूर्तावर राजा विक्रमादित्याने त्या तिन्ही कन्यांशी लग्न केले. त्याप्रसंगी मदनलेखेचा मोठा भाऊ सिंहवर्मा याने विक्रमादित्याला असंख्य अमूल्य रत्ने अर्पण केली. तसेच त्यासमयी अगत्यपूर्वक आलेल्या मदनमंजरीनेही राजाला असंख्य रत्नराशी भेट म्हणून दिल्या. नूतन भार्यांच्या सहवासात दिग्विजयी विक्रमादित्य मोठ्या आनंदाने व सुखाने काळ कंठू लागला.

सम्राट विक्रमादित्याच्या राजसभेत एक उत्तम चित्रकार होता. त्याचे नाव नगरस्वामी असे होते. चित्रकलेत त्याने असामान्य कौशल्य प्राप्त केले होते. त्याच्या कलेवर संतुष्ट झालेल्या राजाने त्याला शंभर गावे इनाम दिली होती. नगरस्वामी एक दिवसाआड वेगवेगळ्या आकाराची एक पुतळी तयार करून राजाला भेट म्हणून देत असे. एकदा नगरात एक मोठा उत्सव सुरू झाला होता. त्याच्या धांदलीत पुतळी तयार करायला नगरस्वामीला फुरसत मिळाली नाही. आणि त्याला तिचे विस्मरणही झाले. आता दुसऱ्या दिवशी राजाकडे गेल्यावर त्याला काय द्यायचे ? अशी त्याला चिंता पडली. तेवढ्यात त्याच्याकडे एक वाटसरू आला. त्याने एक मोठी चोपडी नगरस्वामीच्या हाती दिली. आणि काहीतरी कामाच्या निमित्ताने तो तेथून निघून गेला. त्या चोपडीत काय आहे. ते पाहण्याची नगरस्वामीला उत्सुकता वाटली. म्हणून त्याने ती उघडून पाहिली. तेव्हा त्याला एका पानावर एक सुंदर पुतळी चितारलेली दिसली. ते चित्र उद्या राजाला द्यावे असे त्याने मनाशी ठरविले. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी नगरस्वामीने ती सुंदर पुतळी राजाला भेट म्हणून दिली. त्या सुस्वरूप पुतळीचे चित्र पाहून आश्चर्यचकित झालेला विक्रमादित्य नगरस्वामीला म्हणाला, "हे चित्र काही तू काढलेले नव्हे !" असे राजाचे शब्द ऐकून नगरस्वामीने त्याला सर्व हकीकत सांगितली. आणि राजाकडे क्षमेची याचना केली. नगरस्वामी निघून गेल्यावर विक्रमादित्य त्या चित्रातील पुतळीकडे एकटक बघतच राहिला.

आणि पुढे तर जिच्या लावण्याने राजाला आकर्षित केले होते, अशी ती पुतळी अहर्निश राजाच्या ध्यानी मनीच राहू लागली.

एके दिवशी विक्रमादित्याची चिंताक्रांत व व्याकुळ मुद्रा भद्रायुध नावाच्या एका राजसेवकाने पाहिली. तेव्हा भीत भीतच त्याने राजाला चिंतेचे कारण विचारले. तेव्हा राजा म्हणाला, "मित्रा, नगरस्वामीने आणून दिलेल्या एका अद्‌भुत चित्रपुतळीचे मी चिंतन करीत असल्याने पुतळीच्या रूपात असलेली ती कन्या काल रात्री माझ्या स्वप्नात आली होती. मी समुद्र ओलांडून एका सुंदर नगरात गेलो आहे. तिथे आपल्या मैत्रिणींच्या मेळाव्यात ती होती. त्यांच्या हातात शस्त्रे होती. त्यांची माझ्याकडे नजर जाताच, 'मारा, याला मारून टाका.' असे मोठ्यांदा म्हणत त्या माझ्या दिशेने धावल्या. तेवढ्यात एक तापसी त्वरेने तेथे आली. आणि तिने मला तेथून नेऊन आपल्या घरात दडवून ठेवले. ती मला म्हणाली, 'वत्सा, ती पुरुषाचा द्वेष करणारी राजकन्या मलयवती आहे. कोणीही पुरुष दिसताच ती आपल्या मैत्रिणीकडून त्याला मारून टाकते म्हणून मी तुला माझ्या घरी घेऊन आले.'

असे म्हणून त्या तापसीने मला स्त्रीवेष देऊन त्या राजकन्येकडे नेले. राजकन्या मलयवतीला पाहताच चित्रातील पुतळी ती हीच अशी माझी खात्री पटली. व मला फार आनंद झाला. तेवढ्यात राजकन्येने तापसीला विचारले, 'भगवती, आम्ही आता तिथे पाहिलेला तो पुरुष कोठे गेला ?' तेव्हा तापसी म्हणाली, 'राजकन्ये, इथं पुरुष कोठून येणार ?' असे म्हणून माझ्याकडे पाहून ती पुढे म्हणाली, 'ही माझ्या बहिणीची मुलगी माझ्याकडे काही दिवस राहावयास आली आहे.' असे तिचे शब्द ऐकताच राजकन्येने तिच्याकडे पाहिले. आणि माझ्या देखण्या रूपाने आकर्षित झालेली ती तापसीला म्हणाली, "ही तुझी भाची माझी ही पाहुणी आहे. मी तिला माझ्याबरोबर घेऊन जाते. आणि तिचे आदरातिथ्य करून परत तुझ्याकडे पाठविते." असे म्हणून राजकन्येने मला राजवाड्यातील अंतःपुरात नेले. तिने मला अत्यंत प्रेमळपणे वागविले. आणि ती माझ्याशी अत्यंत मोकळेपणाने बोलू लागली. मी तिच्याशी काही बोलणार तोच मला झोपेतून जाग आली आणि ते सुंदर स्वप्न नाहीसे झाले."

असे राजाला पडलेले स्वप्न खरेच असले पाहिजे अशी कल्पना करून भद्रायुध राजाला आश्वासन देत म्हणाला, "महाराज, आपणास स्वप्नात ज्या सुंदर नगरीचे दर्शन झाले, तिचे आपल्याला हुबेहूब चित्र काढता आले तर त्या राजकन्येचा शोध लावण्याचा प्रयत्न करता येणे मला शक्य होईल." तेव्हा विक्रमादित्याने त्या सुंदर नगरीचे अगदी हुबेहूब चित्र काढून ते भद्रायुधाच्या स्वाधीन केले. भद्रायुधाने ते चित्र घेऊन नवीनच बांधलेल्या एका आतिथ्यगृहातील भिंतीवर लावून ठेवले. नंतर त्याने दूरदेशातून तेथे येणाऱ्या प्रवाशांच्या आतिथ्याची चांगली व्यवस्था केली. प्रत्येक प्रवाशाला तिथे सुग्रास भोजन, दोन भरजरी वस्त्रे व सुवर्णदक्षिणा मिळावीत, अशीही व्यवस्था त्याने केली. आणि भिंतीवर लावलेल्या चित्रातील नगर ओळखणारा कोणी प्रवासी जर येथे आला तर मला कळवा अशी आज्ञा त्याने अतिथ्यगृहरक्षकाला दिली.

काही दिवसातच आतिथ्यगृहाची प्रसिद्धी सर्वत्र पसरली. ती ऐकून एके दिवशी शंबरसिद्धी नावाचा एक प्रवासी त्या अतिथीगृहात आला. भिंतीवरील चित्र त्याच्या नजरेस पडताच तो आश्चर्यचकित होऊन म्हणाला, "अहो, हे नगर कोणी चित्रित केले? कारण, मी आणि चित्रकार या दोघांशिवाय कोणीही ते नगर पाहिलेले नाही. तेव्हा त्या नगरीचे चित्र इथं कसे आले?" असे त्या प्रवाशाचे शब्द ऐकताच अतिथ्यगृहरक्षकाने ती वार्ता भद्रायुधाला कळविली. तेव्हा भद्रायुध त्वरेने तेथे आला. आणि त्याने त्या प्रवाशाला राजाच्या भेटीस नेले. तेव्हा राजाने अधीरपणाने त्याला विचारले, 'खरंच का ते नगर तू पाहिले आहेस?' "महाराज," शबरसिद्धी म्हणाला, "समुद्राच्या पलिकडे असलेल्या द्वीपात वसलेले मलयपूर नावाचे ते रमणीय नगर आहे. मी ते पाहिलेले आहे. त्या नगराचा राजा मलयसिंह आहे. त्याला मलयवती नावाची एक सुंदर कन्या आहे. पूर्वी ती पुरुषांचा फार द्वेष करीत असे. पण स्वप्नात पाहिलेल्या एका देखण्या पुरुषावर तिचे मन जडल्यापासून तिचा पुरुषद्वेष पार नाहीसा झाला आहे आणि आता ती त्याच्या प्राप्तीसाठी दुःखित झाली आहे. तिने अशी प्रतिज्ञा केली आहे की, सहा महिन्याच्या आत आपला प्रियकर भेटला नाही तर आपण अग्निप्रवेश करू. त्या गोष्टीला आता पाच महिने झाले आहेत. ही सगळी वार्ता मी जेव्हा त्या नगरीत होतो तेव्हाच

आ. क्र. २९८२
3/3/07

माझ्या कानी पडली.''

शबरसिद्धीने सांगितलेली हकिकत राजाच्या स्वप्नाशी अत्यंत जुळती असल्यामुळे ती कानी पडताच राजाला फार आनंद झाला. त्याने शबरसिद्धीला पुष्कळ द्रव्य देऊन निरोप दिला. दुसऱ्या दिवशी विक्रमादित्य आपले निवडक सैन्य बरोबर घेऊन मलयपुराकडे जाण्यास निघाला. नंतर यथावकाश समुद्र ओलांडून तो मलयपुरास पाहोचला. नगरात प्रवेश करताच तेथील एका मोठ्या चौकात असंख्य नगरिकांचा मेळावा त्याला दिसला. त्या मेळाव्यातील प्रत्येक नागरिक दुःखी कष्टी दिसत होता. तेव्हा राजाने एका नागरिकजवळ जाऊन चौकशी केली. तेव्हा तो म्हणाला, ''काय सांगू बाबा, प्रतिज्ञेप्रमाणे सहा महिने होऊन गेले. राजकन्या मलयवतीला प्रियकराची प्राप्ती न झाल्यामुळे ती आता अग्निप्रवेश करीत आहे.'

असे त्या नागरिकाचे दुःखित शब्द ऐकताच विक्रमादित्य अत्यंत त्वरेने धावत जाऊन मलयवती समोर उभा राहिला. त्याला पाहताच हाच तो स्वप्नातील देखणा पुरुष असे तिने त्याला ओळखले. तिच्या भेटीने त्यालाही आनंद झाला. मलयवतीच्या आईवडिलांनाही फार आनंद झाला. त्यांनी विक्रमादित्याचे मोठ्या सन्मानाने स्वागत केले. आपणास जावई म्हणून सम्राट विक्रमादित्याचा लाभ झाला असे समजताच राजा, राणी, मलयवती यांच्यासह राजाने आपल्या लाडक्या मलयवतीच्या हातात सम्राट विक्रमादित्याचा हात दिला. त्याप्रसंगी नगरात मोठा आनंदोत्सव साजरा झाला. पुढे काही दिवस मलयपुरात राहून सम्राट विक्रमादित्य मलयवतीसह आपल्या उज्जयिनी नगरास परत गेला.

पुढे एके दिवशी धैर्यधर नावाच्या राजसेवकाने अरण्यात एक भयंकर डुक्कर पाहिल्याचे वृत्त राजा विक्रमादित्याला सांगितले. तेव्हा त्याची शिकार करण्याकरिता राजा धैर्यधरासह त्या घनदाट अरण्यात शिरला. त्या अरण्यात वाघ, सिंहादि अनेक हिंस्र पशू होते. राजा त्यांची शिकार करू लागला. तेवढ्यात राजाला एक फार मोठा काळा कभिन्न डुक्कर दिसला. तेव्हा तो त्या डुकराच्या मागे लागला. पण सामान्य घोड्यावरून त्या डुकराचा पाठलाग करणे

अवघड आहे, हे ओळखून राजाने आपला रत्नाकर नावाचा एक दिव्य घोडा आणवून घेतला. नंतर वाऱ्याप्रमाणे अतिशय वेगाने धावणाऱ्या रत्नाकरावर स्वार होऊन राजा त्या डुकराचा पाठलाग करू लागला. पण जीवाच्या भीतीने, राजाच्या घोड्यासारखाच वेगाने धावणारा तो डुक्कर एकदम दिसेनासा झाला. तेव्हा अरण्यात एकटाच फार दूरवर आलेला राजा थोडा वेळ थांबला. एवढ्या दूरवर येऊन डुक्कर हाती लागला नाही म्हणून तो खिन्न झाला. तेवढ्यात मागे राहिलेला धैर्यधर त्याच्यापाशी येऊन पोहोचला.

राजाने त्याला विचारले, 'धैर्यधरा, त्या डुकराचा पाठलाग करीत या अरण्यात आपण किती दूर आलो हे तुला सांगता येईल का ?' असे राजाचे शब्द ऐकून धयैधर म्हणाला, 'महाराज, आपण सुमारे बाराशे कोस दूर आलो आहोत' ते ऐकून आश्चर्यचकित झालेला राजा त्याला म्हणाला, 'हे तुला कसे समजले ? शिवाय तुझ्याजवळ कोणतेही वाहन नसताना तू माझ्याबरोबर एवढे दूर कसा आलास ?' तेव्हा धैर्यधर म्हणाला, 'महाराज, माझ्याजवळ पायाना लावण्यासाठी म्हणून एक लेप आहे. तो मला माझ्या निभर्यपणावर प्रसन्न झालेल्या चंडी नावाच्या एका यक्षिणीने दिला आहे. विनात्रासाने मला सर्व तीर्थांची यात्रा करता यावी, असा एखादा उपाय सांग, अशी मी तिला विनंती केली होती. ती मान्य करून तिने माझ्या हाती तो दिव्य लेप दिला. त्याच्या बळावर मी त्रासावाचून सर्व तीर्थयात्रा केल्या. आणि आज तुमच्या मागे एवढ्या दूरवर धावत आलो. एवढेच नव्हे तर त्याच्या सामर्थ्यावर मी दररोज या अरण्यात येऊन येथील गोड फळे खातो. आणि आपल्या सेवेसाठी परत उज्जयिनी नगरात येतो.' एवढे बोलून धैर्यधर काही क्षण थांबला.

नंतर तो पुढे म्हणाला, 'महाराज, आपण जर त्या मधुर फळांचा आस्वाद घेणार असाल तर मी ती आपणास आणून देतो.' असे धैर्यधराचे शब्द ऐकून विस्मित झालेला राजा त्याला म्हणाला, 'मला काही भूक लागली नाही. तूच फार थकलेला दिसतोस तेव्हा तू काही फलाहार घे. नंतर आपण त्या डुकराच्या शोधार्थ पुढे निघू.' नंतर राजाज्ञेप्रमाणे धैर्यधराने तेथून थोड्या अंतरावर आढळलेली एक काकडी खाल्ली. तो काय आश्चर्य! धैर्यधर एकाएकी अजगर होऊन पडला. ते पाहून राजा विक्रमादित्य अत्यंत

आश्चर्यचकित झाला. त्याचबरोबर आपला विश्वासू सेवक अजगर झाला म्हणून त्याला दुःखही झाले. आता त्या अरण्यात राजा एकटाच होता म्हणून त्याने भूपकेतू नावाच्या एका वेताळाचे स्मरण केले. पूर्वी राजाने केवळ आपल्या नजरेनेच त्या वेताळाला नेत्ररोगातून मुक्त केले होते. त्यामुळे तो राजाचा सेवक झाला होता. त्याचे स्मरण करताच तो राजाजवळ येऊन मोठ्या नम्रपणे म्हणाला, 'महाराज, काय आज्ञा !' तेव्हा विक्रमादित्य त्याला म्हणाला, 'मित्रा, माझा धैर्यधर नावाचा एक सेवक एकाएकी अजगर होऊन पडला आहे त्याला तू पूर्वीसारखे कर !'

असे राजाचे शब्द ऐकून वेताळ नम्रपणाने म्हणाला, 'महाराज, तसे करण्याचे सामर्थ्य माझ्यापाशी नाही.' ते ऐकून राजा त्याला म्हणाला, 'असे आहे तर मग आपण जवळच दिसत असलेल्या भिल्ल वस्तीत जाऊन त्यावर काही उपाय मिळतो का ते पाहू या !' असे म्हणून राजा भूतकेतूबरोबर भिल्लांच्या वस्तीकडे गेला. नाना रत्नालंकार धारण केलेला एक पुरुष मोठ्या धीटपणे आपल्या वस्तीकडे येत आहे असे पाहताच असंख्य सशस्त्र भिल्लांनी त्यांना वेढा दिला. तेव्हा राजाच्या आज्ञेने भूतकेतूने बाणांचा वर्षाव करणाऱ्या पाचशे भिल्लांना खाऊन टाकले. ते पाहून उरलेले सर्व भिल्ल जिवाच्या भीतीने पळून गेले आणि त्यानी एकाकिकेसरी या नावाच्या आपल्या राजाला ते भयंकर वृत्त सांगितले. तेव्हा तो रागाने लाल होऊन आपल्या वस्तीच्या बाहेर पडला. पण आपल्या वस्तीकडे येणारा वीर पुरुष महावीर राजा विक्रमादित्य आहे असे कळताच त्याने राजाचे पाय धरले. तेव्हा राजाने आपले तेथे येण्याचे कारण त्याला सांगितले. ते ऐकून एकाकिकेसरी म्हणाला, 'महाराज, माझ्या मुलाला वनौषधींची चांगली माहिती आहे. तेव्हा आपल्याबरोबर असलेल्या या सेवकाला जिथे आपला दुसरा सेवक अजगर होऊन पडला आहे ते स्थळ दाखवा. म्हणजे तो त्याला औषधाने आपले पूर्वीचे रूप प्राप्त करून देईल.'

ते ऐकून राजाने तत्काल भूतकेतू वेताळाला एकाकिकेसरीच्या मुलाबरोबर पाठविले. थोड्याच वेळात वनौषधीच्या अद्‌भुत प्रभावाने आपले पूर्वीचे मनुष्यरूप प्राप्त झालेला धैर्यधर राजाला येऊन भेटला नंतर एकाकिकेसरीच्या विनंतीवरून राजा त्याच्या घरी गेला. तेथे स्नान भोजन

इत्यादि झाल्यानंतर राजाला ज्या एका गोष्टीचे आश्चर्य वाटत होते त्या गोष्टीबद्दल त्याने एकाकिकेसरीला विचारले, 'मित्रा, रागावू नकोस मला नवल वाटले म्हणून विचारतो. तू आणि तुझी भार्या तरुण दिसता. आणि तुझी मुले वृद्ध दिसतात. असे का ?' असे राजाचे शब्द ऐकून तो भिल्ल स्वामी म्हणाला, "महाराज, ती एक नवलाची कथा आहे. ऐका. मी मूळचा मायापुरी नावाच्या नगरात राहणारा चंद्रस्वामी नावाचा ब्राह्मण. एके दिवशी वडिलांच्या आज्ञेने मी लाकूडतोड करण्यास अरण्यात गेलो. तेथे एका वानराने माझा रस्ता अडविला. त्या वानराची मुद्रा मोठी दुःखीकष्टी दिसत होती. आपल्या व्याकुळ नजरेने माझ्याकडे बघून तो मागे मान वळवून बघत होता. तेव्हा तो कोणत्या तरी संकटात आहे असे वाटून मी त्याच्या मागोमाग चालू लागलो. खूप दूर गेल्यावर अखेर एका जांभळाच्या झाडापाशी तो वानर येऊन थांबला. आणि चटकन् त्या झाडावर चढून गेला. तेव्हा वेलीनी वेढलेल्या त्या झाडावर तो वानर काठे गेला ते मी पाहू लागलो. तो त्याची वानरी वेलींच्या जाळ्यात गुरफटून पडली आहे असे मला दिसले.

दुसऱ्या क्षणी मी त्या झाडावर सरसर चढलो आणि आपल्या हातातील कुऱ्हाडीने वेलींचे जाळे तोडून त्या वानरीला मुक्त केले. नंतर मी झाडावरून खाली आलो. तेव्हा वानर आणि वानरी यांनी कृतज्ञ नजरेने माझ्याकडे पाहिले. आणि माझ्या पायावर डोकी ठेवली. नंतर तेथून वानर चटकन् कोठे निघून गेला कुणास ठाऊक ! पण मी घराकडे जाण्यासाठी चालू लागणार तोच त्याने माझ्यासमोर येऊन एक दिव्य फळ माझ्या हाती दिले. मी ते घरी घेऊन आलो. आणि भोजन झाल्यावर भार्येसह ते दिव्य फळ खाल्ले. तेव्हापासून आम्हा दोघांना एकही रोग झाला नाही. एवढेच नव्हे तर आमचे म्हातारपणही कायमचे नाहीसे झाले.

असेच काही दिवस निघून गेले. पुढे आमच्या देशात मोठा दुष्काळ पडला. त्यामुळे पुष्कळ लोक देशत्याग करून दुसरीकडे निघून गेले. त्याप्रमाणे मी देखील देशांतर करून भार्येसह येथे आलो. त्यावेळी या प्रदेशावर कांचनदंष्ट्र नावाचा भिल्ल राजा राज्य करीत होता. त्याने मला आपला सेनापती नेमले. त्या राजाची मी अनन्यभावे सेवा केली. म्हणून त्या निपुत्रिक राजाने आपल्या

मृत्यूसमयी आपले हे राज्य मला देऊन टाकले.'' अशी आपली नवलकथा राजाला सांगून भिल्लराजा विक्रमादित्याला म्हणाला, ''महाराज, आपल्या चरणी माझी एक विनंती आहे ती आपण कृपा करून मान्य करावी. माझ्या दुसऱ्या क्षत्रिय पत्नीपासून झालेली मदनसुंदरी नावाची एक लावण्यवती मुलगी आहे. तिला आपणच योग्य वर आहात म्हणून पत्नी या नात्याने आपण तिचा स्वीकार करून मला धन्य करावे.'' असे त्या भिल्ल राजाचे शब्द ऐकून तो मूळचा ब्राह्मण आहे, म्हणून राजाने त्याची विनंती मान्य केली. नंतर एक शुभमुहूर्तावर त्याने भिल्ल राजकन्या मदनसुंदरीशी लग्न केले. पुढे काही दिवस तेथे राहून मदनसुंदरीसह राजा विक्रमादित्य उज्जयिनीकडे परत निघाला. त्याच्या बरोबर धैर्यधर, भूतकेतू आणि मोठी भिल्ल सेना होती.

काही अंतर प्रवास केल्यानंतर राजाज्ञेने मदनसुंदरी भिल्लसेनेसह मुख्य रस्त्याने उज्जयिनी नगराकडे निघाली. आणि राजा विक्रमादित्य, धैर्यधर व भूतकेतू या दोघांना बरोबर घेऊन पूर्वी पाहिलेला डुक्कर कदाचित् पुन्हा दृष्टीला पडेल, या आशेने आडवाटेने अरण्यात गेला. अरण्यातून काही वेळ मार्गक्रमण करीत असताना सुदैवाने तो डुक्कर त्यांच्या नजरेस पडला. तेव्हा राजाने आता त्याची शिकार करायचीच या निर्धाराने आपल्या धनुष्याला एकामागून एक असे पाच तीक्ष्ण बाण जोडून ते डुकरावर सोडले. तेव्हा त्या बाणांनी प्राणांतिक जखमी झालेला तो डुक्कर धाडकन जमिनीवर पडून मरण पावला.

तेव्हा भूतकेतू त्याच्याकडे धावला आणि त्याने त्याचे पोट फाडले. तो काय आश्चर्य! त्या फाटलेल्या पोटातून एक देखणा पुरुष बाहेर पडला. तेव्हा सर्वांसच मोठे आश्चर्य वाटले 'तू कोण?' असे राजा त्या देखण्या पुरुषाला विचारणार तोच पर्वतासारखा एक अवाढव्य हत्ती एका बाजूने त्याच्याकडे धावत आला. तेव्हा विक्रमादित्याने आपल्या एका बाणाने त्या हत्तीचे गंडस्थळ फोडले. त्यामुळे तो प्रचंड हत्ती जमिनीवर कासळला. भूतकेतूने पुढे जाऊन त्याचेही पोट फाडले. त्या क्षणी एक दिव्य पुरुष त्यातून बाहेर पडला. आणि काही क्षणानी त्याच्या मागोमाग एक सुंदर स्त्री देखील बाहेर पडली. या एकामागून एक घडलेल्या अनपेक्षित घटनांनी राजा विक्रमादित्य

आश्चर्याने स्तंभित झाला. हत्तीच्या पोटातून बाहेर पडलेल्यांना 'तुम्ही कोण' असे राजा विचारणार होता तोच डुकराच्या पोटातून बाहेर आलेला देखणा पुरुष राजाला म्हणाला, "महाराज, आम्हांला पाहून आपणास फार आश्चर्य वाटणारच अशीच आमची हकीकत आहे. हत्तीच्या पोटातून बाहेर पडलेला दिव्य पुरुष व मी असे आम्ही दोघेही देवपुत्र आहोत. माझे नाव भद्र. आणि याचे नाव शुभ. एकदा आम्ही असेच भटकत असत ध्यानमग्न असलेले एक मुनी आम्हाला दिसले. तेव्हा त्यांची थोडी थट्टा करावी असे आम्ही ठरविले. मी डुकराचे रूप घेतले आणि याने हत्तीचे रूप घेतले. अशी रूपे धारण करून आम्ही त्या मुनींना त्रास देण्यास सुरुवात केली. तेव्हा त्या रागावलेल्या मुनीनी आम्हाला असा शाप दिला, 'जे रूप धारण करून तुम्ही मला त्रास दिला त्याच रूपात तुम्ही अरण्यात भटकत राहाल. जेव्हा राजा विक्रमादित्य तुम्हाला मारील तेव्हा तुम्हाला तुमचा पूर्वीचा देह प्राप्त होईल!' त्याप्रमाणे आम्ही पशूंचा जन्म घेऊन यावेळे पावेतो या अरण्यात भटकत होतो. आज आपल्या कृपेने आम्हाला आमचा पूर्वदेह प्राप्त झाला आहे. आता आपण या मृत डुकराच्या गळ्याला व हत्तीच्या पाठीला स्पर्श करा म्हणजे आपणास एक दिव्य तलवार व एक ढाल प्राप्त होईल." एवढे बोलून ते दोघे देवपुत्र अदृश्य झाले. भद्राने सांगितल्याप्रमाणे राजाने केले. तेव्हा त्याच्या हाती एक दिव्य तलवार व विशाल ढाल शोभू लागली.

नंतर राजा विक्रमादित्याने त्या सुंदर स्त्रीस विचारले, "तू कोण ? आणि या हत्तीच्या पोटात कशी ?" तेव्हा ती नम्रपणे म्हणाली, "महाराज, आपल्या नगरात धनदत्त नावाचे एक व्यापारी आहेत. त्यांची मी पत्नी आहे. एके दिवशी मी आपल्या वाड्याच्या माडीवर झोपले होते. त्यावेळी या हत्तीने तेथे येऊन मला गिळून टाकले. तेव्हापासून आजवेळेपावेतो मी त्याच्याच पोटात होते!" असे बोलून ती स्त्री दुःख करू लागली. तेव्हा राजाने तिला तिच्या पतीकडे सुखरूप पोहोचविण्याचे आश्वासन दिले. आणि ताबडतोब भूतकेतूबरोबर तिला उज्जयिनीस जात असलेल्या मदनसुंदरीकडे पोहोचविले.

ते कार्य करून भूतकेतू परत आल्यावर राजा पुन्हा अरण्यातील आडवाटेने पुढे निघाला. काही अंतर चालून जाताच आणखी एक अकल्पित

दृश्य त्याच्या नजरेस पडले. एक मोठा परिवार सशस्त्र सैनिकांसह एका बाजूने चालला होता. तो परिवार कोणाचा, व त्यात कोण आहे हे माहित करून घेण्यासाठी राजाने धैर्यधराला तिकडे पाठविले. तेव्हा त्याने तिथे जाऊन एका वृद्ध सेवकालाच राजाकडे आणले. राजाने त्या परिवारासंबंधी त्यास विचारले, तेव्हा तो म्हणाला, ''महाराज, समुद्रात कटाह या नावाचे एक वैभवसंपन्न द्वीप आहे. त्या द्वीपाच्या गुणवंत राजाचे नाव गुणसागर असे आहे. त्याला गुणवती नावाची एक सद्‌गुणी लावण्यवती कन्या आहे. सप्त द्वीपावर राज्य करणाऱ्या राजाची ती भार्या होईल, असे सिद्धांनी सांगितले आहे. तेव्हा सम्राट विक्रमादित्य हाच तिला योग्य पती आहे, असे जाणून गुणसागर राजाने तिला आपल्या परिवारासह नौकेतून उज्जयिनी नगराकडे पाठविले, पण आमची नौक सुवर्णद्वीपापाशी येताच एका प्रचंड माशाने ती गिळून टाकली. त्यामुळे त्या माशाला स्वतःच्या शरीराचा तोल सावरता येईना. तेव्हा लाटांवर तरंगत तो किनाऱ्यावर येऊन पडला. आणि तेथेच गतप्राण झाला. किनाऱ्यावर पडलेला तो प्रचंड मासा पाहून असंख्य कोळी तेथे धावतच आले. त्यांनी आपल्या तीक्ष्ण शस्त्रांनी त्या माशाचे पोट फाडले. तेव्हा त्यातून आमची नौका जशीच्या तशी बाहेर पडली. ही विस्मयजनक वार्ता त्या द्वीपाच्या चंद्रशेखर नावाच्या राजाला कळली. तेव्हा तो स्वतः समुद्रकिनाऱ्यावर आला., त्याने चौकशी केली. तेव्हा नौकेतील लोकांनी त्याला सर्व हकिकत सांगितली. आपलीच भाची गुणवती त्या नौकेतून प्रवास करीत होती हे कळताच राजा फारच आश्चर्यचकित झाला. नंतर त्याने आपल्या भाचीसह नौकेतील सर्व लोकांना नगराकडे नेले. सर्व लोकांची त्याने यथायोग्य व्यवस्था केली. आणि जिवावरच्या संकटातून आपली भाची वाचली म्हणून त्याने नगरात आनंदोत्सव केला.

चंद्रशेखर राजाने, आपली कन्या चंद्रावती विक्रमादित्यालाच द्यावयाची असे पूर्वीच निश्चित केले होते. म्हणून गुणवतीबरोबरच त्याने चंद्रावतीलाही उज्जयिनीकडे पाठविले. शुभ मुहूर्तावर एका बळकट नौकेत बसून निघालेल्या त्या दोघी वैभवसंपन्न राजकन्या सुखरूपपणे जलप्रवास करून परतीरास पोहोचल्या. आता त्या आपल्या परिवारासह उज्जयिनीस चालल्या

आहेत. त्यांच्या विश्वासू सेवकापैकी मी एक सेवक आहे. आणखी एक महत्वाची गोष्ट अशी की आम्ही आज या अरण्यातून जाताना एक हत्ती व एक डुक्कर असे दोघेही आमच्या अंगावर धावून आले. तेव्हा आता आपण कोणीही जिवंत राहात नाही अशी आमची खात्री झाली. आणि आम्ही परमेश्वराचा धावा करीत म्हणालो. "हे लोकपालांनो, विक्रमादित्याला वरण्यासाठी निघालेल्या या राजकन्यांना हे रानटी पशू मारण्याच्या बेतात आहेत. आता तुम्हीच त्यांचे रक्षण करा !" आश्चर्याची गोष्ट अशी की आमचा धावा कानी पडताच डुक्कर व हत्ती जागीच थबकून उभे राहिले, आणि मनुष्यवाणीने म्हणाले, "त्या पुण्यवंत राजाच्या नामोच्चारानेच तुमच्यावरील संकट नाहीसे झाले आहे. तुम्ही मुळीच भिऊ नका. त्या पुण्यवंत राजाचे दर्शन लवकरच तुम्हाला या अरण्यातच घडेल" असे म्हणून ते दोघे पशू निघून गेले. आणि आता आम्ही उज्जयिनीच्या दिशेने पुढे प्रवास करू लागलो आहोत."

त्या सेवकाने अशी आपली हकिकत सांगितली. तेव्हा धैर्यधराने 'हेच ते विक्रमादित्य महाराज !' असे म्हणून विक्रमादित्याची त्याला ओळख करून दिली, मग त्या सेवकाने राजाला नमस्कार केला आणि आपल्या परिवारात असलेल्या गुणवती व चंद्रावती या राजकन्यांचा स्वीकार करण्याची त्याला सविनय प्रार्थना केली. राजाने ती त्याची विनंती मान्य केली. नंतर 'त्या दोघी राजकन्या मदनसुंदरीबरोबरच उज्जयिनीस जाऊ द्या' असे म्हणून त्याने भूतकेतू वेताळाकडून त्यांना सर्व परिवारासह मदनसुंदरीकडे पाठविले. राजाज्ञेप्रमाणे ते कार्य करून भूतकेतू परत आल्यावर विक्रमादित्य पुन्हा अरण्यातील आडवाटेने चालू लागला.

त्यावेळी नुकताच सूर्यास्त झाला होता. राजा, धैर्यधर व भूतकेतू यांच्यासह पुढे वाटचाल करीत असताना एकाएकी मृदंगाचा आवाज त्याच्या कानी पडला. अशा वेळी या घनदाट अरण्यात मृदंगाचा आवाज कोठून येत आहे असा राजाच्या मनात विचार येऊ लागला. तेवढ्यात भूतकेतू म्हणाला, 'महाराज, येथून जवळच विश्वकर्म्याने निर्मिलेले एक अद्भुत व रमणीय शिवमंदिर आहे. त्या मंदिरात मृदंगवादन चालले आहे.' भूतकेतूने अशी वार्ता सांगताच राजा त्या मंदिराकडे निघाला. तेथे पाहोचताच त्याने आपला घोडा

मंदिराजवळ असलेल्या एका झाडाला बांधला आणि त्याने मंदिरात प्रवेश केला. तेथील दृश्य मोठे अलौकिक होते. मंदिराच्या गाभाऱ्यात रत्नमय शिवलिंग झळकत होते. त्याची नुकतीच पूजा झालेली असून त्याच्यापुढे दीप तेवत होते. अशा त्या शिवलिंगासमोर दिव्य देखणे पुरुष व सुंदर स्त्रिया गात, नृत्य करीत होत्या.

राजाने धैर्यधर व भूतकेतू यांच्यासह मंदिरात प्रवेश करून थोडे पुढे जाताच त्या स्त्री पुरुषांनी आपले नृत्य थांबविले. आणि आणखी एक अद्‌भुत चमत्कार राजाच्या दृष्टीस पडला. त्या स्त्रियांनी एकामागून एक असा देवालयाच्या सभामंडपातील एका खांबावरील पुरुषाकार मूर्तीत प्रवेश केला. ते पाहून राजा आश्चर्याने थक्क झाला. तेव्हा भूतकेतू त्याला म्हणाला, 'महाराज, विश्वकर्म्याने निर्मिलेली ही अलौकिक माया चिरंतन आहे. दररोज सूर्योदय व सूर्यास्त यावेळी इथे ही अद्‌भुत घटन घडते.' असे भूतकेतूचे बोलणे ऐकून विस्मय करीतच राजा त्या मंदिराची रमणीय चित्रकला व शिल्पकला पाहात फिरू लागला.

तेव्हा एका खांबावरील अतिशय सुंदर अशी एक पुतळी त्याच्या नजरेस पडली. तेव्हा तो एकटक त्या पुतळीकडे बघतच राहिला. त्याच्या मनात विचार आला, 'असले अलौकिक सौंदर्य असलेली स्त्री आपणास मिळाली नाही तर आपले राज्य व आपले आयुष्य खरोखरच व्यर्थ आहेत.' राजाची मन:स्थिनी भूतकेतूने जाणली. तो म्हणाला, 'महाराज, कलिंग देशाची राजकन्या कलिंगसेना अनुपम सुंदर आले. तिच्यासारखी मूर्ती तयार करण्याची इच्छा असणाऱ्या वर्धमान नगरातील एका शिल्पकाराने ही पुतळी निर्माण केली. तेव्हा आपण उज्जयिनीस गेल्यावर कलिंगसेन राजाजवळ तिला मागणी घाला. त्या गोष्टीस त्याने नकार दिला तर आपण आपल्या पराक्रमाने तिचे हरण करा!' असे भूतकेतूचे बोलणे राजाला पसंत पडले. नंतर आपल्या सेवकासह राजाने ती रात्र त्या शिवमंदिरातच घालविली. दुसऱ्या दिवशी सकाळी ते तिघे तेथून पुढच्या प्रवासाला निघाले.

त्या अरण्यातून पुढे पुढे जात असताना त्यांना एका अशोक वृक्षाखाली चांगला पेहेराव केलेले दोन तरुण बसलेले दिसले. राजा आपल्या

दिशेने येत आहे असे पहाताच ते चट्कन् उठून उभे राहिले आणि त्यांनी राजाला नम्रपणे वंदन केले. तेव्हा अशा ठिकाणी आपल्याला ओळखणारे ते कोण आहेत असे राजाला वाटून त्याने त्यांना विचारले, 'तुम्ही कोण ? आणि इथं का बसलांत ?' तेव्हा त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, 'महाराज, मी उज्जयिनी नगरातील धनदत्त नावाचा एक व्यापारी आहे. एके दिवशी माडीवर झोपलेली माझी भार्या एकाएकी नाहीशी झाली. तिच्या शोधार्थ मी माझ्या ह्या मित्रासह नगराबाहेर पडलो. मी पुष्कळ दिवस तिचा शोध करीत आहे. पण अजून काही तिचा पत्ता लागला नाही. तिचे कोणी हरण केले असले तरी तिच्या चारित्र्याविषयी माझ्या मनात संशय येण्याचे कारण नाही. कारण 'माझे आचरण शुद्ध असेल तर ही माळ कधीही सुकणार नाही.' असे सांगून तिने मला दिलेली माळ अजून सुकलेली नाही. म्हणून मला मोठे समाधान वाटत आहे ! पुढे वाटचाल करीत आम्ही या अरण्यात आलो. याच अरण्यात एक प्रचंड हत्ती आमच्या नजरेस पडला. माझ्याकडे त्याची नजर जाताच, त्याने माझ्या भार्येला आपल्या तोंडातून बाहेर काढले. आणि पुन्हा तिला गिळून टाकले. तेव्हा आधी आश्चर्यचकित व नंतर दुःखी होऊन मी त्या हत्तीकडे बघत आहे, तोच तो एकाएकी कुठे निघून गेला कुणास ठाऊक! तो हत्ती पुन्हा काही आम्हाला दिसला नाही.' अशी धनदत्तने आपली दुःखद हकीकत सांगितली. तेव्हा विक्रमादित्याने त्याला धीर दिला. तो म्हणाला, 'मी त्या हत्तीला ठार मारून तुझ्या भार्येची मुक्तता केली आहे.' असे म्हणून राजाने भूतकेतूकडून त्याची व त्याच्या भार्येची भेट घडवून दिली. नंतर विक्रमादित्य राजा गुणवती, चंद्रावती व मदनसुंदरी यांच्यासह उज्जयिनी नगरात जाऊन पोहचला. तेथे पोहोचल्यावर एका शुभ मुहूर्तावर त्याने गुणवती व चंद्रावती यांच्याशी यथाशास्त्र विवाह केला.

अरण्यातील शिव मंदिरात तेथील खांबावरल्या सुंदर मूर्तीबद्दल सांगितलेले भूतकेतूचे शब्द विक्रमादित्याच्या मनात होतेच. म्हणून त्याने कलिंगसेनेला मागणी घालण्यासाठी आपला एक दूत कलिंग राजाकडे पाठविला. त्याने त्या दूताबरोबर असा निरोप दिला की, 'तुम्ही आपले कन्यारत्न विक्रमादित्य राजाला देऊन त्याच्याशी सख्यत्व करा. आणि त्याची कृपा

संपादन करून सुखाने आपले राज्य करा.' असा विक्रमादित्याचा निरोप ऐकून कलिंगसेन राजाला राग आला. तो म्हणाला, 'आम्हाला अशी आज्ञा करणारा विक्रमादित्य कोण? आम्ही त्याला आमची कन्या देणार नाही.' असा कलिंगसेनाचा निरोप दूताने परत येऊन राजा विक्रमादित्यास सांगितला. तेव्हा त्याला फार राग आला. त्याने ताबडतोब आपल्या प्रचंड सैन्यासह कलिंग देशावर स्वारी केली. त्याच्या सैन्यात भुते, वेताळ यांच्यासारखे भयंकर प्राणीही होते. अशा सैन्यासह विक्रमादित्याने कलिंगसेनाच्या राजधानीला वेढून टाकले. राजा कलिंगसेनानेही युद्धाची कडेकोट तयारी केली होती. 'आता युद्ध करण्याची वेळ आली तर आपल्या भावी सासऱ्याला मारण्याची पाळी येईल' अशा विचाराने विक्रमादित्य थोडा खिन्न झाला. तेव्हा तसे न करता एखादी युक्ती योजून आपले इष्टकार्य साधून घ्यावे असे त्याने आपल्या मनाशी निश्चित केले.

त्याप्रमाणे राजा विक्रमादित्य रात्री वेताळाच्या सिद्धीने, वेताळासह कोणाच्या दृष्टीस न पडता कलिंगसेनाच्या खास महालात गेला. तेथे जाताच वेताळाने स्वस्थ झोपलेल्या कलिंगसेनाला जागे केले. आणि तो त्याला म्हणाला, 'अरे वेड्या, महाप्रतापी विक्रमादित्याशी वैर निर्माण करून तुला एवढी गाढ झोप लागते तरी कशी?' अशा वेताळाच्या शब्दांनी भयग्रस्त झालेला राजा कलिंगसेन आपल्या शय्येवरून धडपडत उठून उभा राहिला. वेताळासह आपल्या महालात आलेल्या साहसी व निर्भय विक्रमादित्याला पाहून कलिंगसेन आश्चर्याने थक्क झाला. त्याने विचार केला, 'या थोर राजाशी निष्कारण वैर करण्यात आपले सर्वस्वी अकल्याण आहे. तेव्हा त्याने आपल्या कन्येला घातलेली मागणी मान्य करावी हे चांगलं!'

त्याप्रमाणे त्याने राजा विक्रमादित्याला सांगून त्याला वंदन केले. तेव्हा संतुष्ट झालेला विक्रमादित्य वेताळासह त्या महालातून एकाएकी अदृश्य होऊन आपल्या शिबिरात परत आला. दुसऱ्या दिवशी युद्धाचे वातावरण पार बदलून जाऊन चहूकडे मंगल विवाहकार्याची एकच धांदल उडाली. सगळीकडे आनंदाचे वातावरण पसरले. एका शुभमुहूर्तावर कलिंगसेन राजाने आपली मुलगी कलिंगसेना हिचा हात राजा विक्रमादित्याच्या हाती दिला. हे मंगल

विवाहकार्य फार मोठ्या थाटामाटाने साजरे झाले. कलिंगसेनेवर दृढ प्रेम असल्यामुळेच विक्रमादित्याने तिच्या वडिलांशी युद्ध न करून तिला न दुखविता मोठ्या युक्तीने तिचे पाणिग्रहण केले होते. त्यामुळे कलिंगसेनेला त्याच्याबद्दल जास्त प्रेमादर वाटू लागल्यास नवल ते काय! लग्नानंतर श्वशुरगृही काही दिवस राहून विक्रमादित्य कलिंगसेनेसह आपल्या उज्जयिनी नगरात परत गेला.

अशा रीतीने प्रतापी, दयाळू, न्यायी इत्यादि सद्गुणांनी युक्त अशा सम्राट विक्रमादित्याने सप्तद्वीपातील प्रजाजनांना आनंद देत खूप वर्षे मोठ्या सुखाने राज्य केले.

# एका मृत्युंजयाची गोष्ट

पूर्वकल्पामध्ये काल या नावाचा कोणी एक धर्मशील व सदाचारी ब्राह्मण राहत होता. पुष्कर तीर्थावर राहून तो रात्रंदिवस जप करू लागला. वर्षामागून वर्षे अशी दोनशे वर्षे उलटून गेली तरी त्याच्या जपाची समाप्ती झाली नाही. अखेर त्या महान जपाच्या प्रभावाने त्या ब्राह्मणाच्या डोक्यातून हजार सूर्यांच्या तेजाने जणू एकवटलेली अशी एक अखंड भयंकर प्रखर आणि जळजळीत ज्योत बाहेर पडली. ती आकाशात उंच उंच जाऊन पसरली.

त्यामुळे सिद्धादि आकशचरांना आकाशातून मुक्तपणे संचार करता येईना. शिवाय त्या ज्योतीच्या आगीने त्रिभुवनाचा दाह होऊ लागला. तेव्हा देवांनाही मोठी चिंता वाटू लागली. त्या भयंकर आपत्तीचे निवारण करण्यासाठी त्या ब्राह्मणाला त्याच्या जपापासून परावृत्त करणे आवश्यक होते. त्याच हेतूने ब्रह्मादि देव त्या ब्राह्मणापाशी गेले आणि त्याला म्हणाले, 'द्विजवर्या, आम्ही तुझ्यावर प्रसन्न झालो आहोत. तुझी जशी इच्छा असेल तसा वर तू आमच्याकडून मागून घे ! कारण तुझ्या तपाच्या प्रखर तेजाने त्रिभुवनाचा दाह होऊ लागला आहे !'

असे देवांचे शब्द ऐकून तो ब्राह्मण त्यांना म्हणाला, 'आपण प्रसन्न झाला आहात तर मला एवढाच वर द्या की माझं मन जपापासून कधीही ढळू नये !' या वराशिवाय दुसरा वर ब्राह्मणाने मागावा म्हणून देव पुन्हा पुन्हा त्याला सांगू लागले. तेव्हा तो तेथून उठला आणि हिमालयाच्या उत्तर भागाकडे निघून गेला. तेथे एका निवांत स्थळी तो पुन्हा जप करण्यात मग्न झाला. तेव्हा त्याचे तेज पूर्वीपेक्षाही अधिक प्रखर होऊन ते जास्तच असह्य झाले.

तेव्हा त्याच्या तपात विघ्न निर्माण करण्याकरिता इंद्राने अप्सरांचा एक तांडा त्याच्याकडे पाठविला. त्या सुंदर अप्सरांनी त्या तपस्व्याचे मन क्षुब्ध होऊन ते तपापासून विचलित व्हावे म्हणून नाना परीने प्रयत्न केले. परंतु तपात



मग्न झालेल्या त्या धीरगंभीर ब्राह्मणाने त्या अप्सरांच्या सर्व लीलांना अत्यंत तुच्छ मानून त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. तेव्हा निराश झालेला तो अप्सरांचा तांडा निमूटपणे पुन्हा इंद्राकडे गेला.

अप्सराही त्या ब्राह्मणाला त्याच्या अखंड जपापासून लवमात्रही परावृत्त करू शकल्या नाहीत असे पाहून देवांनी मृत्यूदेवाला त्याच्याकडे पाठविले. त्याप्रमाणे तो जप करणाऱ्या ब्राह्मणाजवळ गेला अणि त्याला म्हणाला, "हे ब्राह्मणा, माणूस खूप वर्षे जगत नाही हे तुला माहीत आहेच. तेव्हा तू आता आपल्या देहाचा त्याग कर!' असे मृत्यूदेवाचे शब्द ऐकून तो सूज्ञ ब्राह्मण त्याला म्हणाला, "हे मृत्युदेवा, माझं जर आयुष्य संपलं असेल तर तू मला सरळ घेऊन जा की. तू इथे व्यर्थ कशाला थांबला आहेस ? मी स्वतःहून आपलं शरीर मुळीच सोडणार नाही; कारण स्वतःचा घात करणं हे महापाप आहे. ते कोणीही करू नये!" असे त्या ब्राह्मणाचे निर्भीड आणि बाणेदार बोलणे ऐकून मृत्युदेव चिडून पुढे सरसावला आणि त्याला आपल्या बरोबर नेण्याचा नेटाने प्रयत्न करू लागला. पण त्याचा प्रयत्न व्यर्थ झाला. त्या ब्राह्मणाला आपल्याबरोबर

नेणे शक्य नाही असे त्याला आढळून आले तेव्हा तो खिन्न झाला आणि जसा आला तसा परत स्वस्थानी गेला.

त्यानंतर इंद्र पुन्हा त्या ब्राह्मणाकडे गेला, त्याने मृत्यूलाही जिंकणाऱ्या ब्राह्मणाला आपल्या बाहुबलाने उचलून घेतले आणि त्याच्यासह तो स्वर्गलोकी गेला. स्वर्गामध्ये नाना प्रकारचे भोग होते पण त्या सर्वांविषयी विरक्त असलेला तो ब्राह्मण तिथेही स्वतःच्या जपातच मग्न होऊन राहिला. त्याचे तसे आचरण पाहून देवांनी त्याला स्वर्गातून घालवून दिले. तेव्हा तो ब्राह्मण पुन्हा हिमालयाच्या उत्तर भागाकडे गेला आणि तिथे राहून त्याने जप करण्याचे आपले कार्य पुन्हा चालूच ठेवले.

काही दिवसांनी इंद्रादि देव पुन्हा त्याच्याकडे आले आणि पुन्हा त्याला तू वर माग असे आग्रहाने सांगू लागले. तेवढ्यात त्या ठिकाणी इश्वाकु नावाचा राजा तिथे आला. एका जप करणाऱ्या ब्राह्मणासमोर उभे ठाकलेले इंद्रादि देव पाहून त्याला मोठे आश्चर्य वाटले. त्याने सर्व हकीकत विचारून घेतली. नंतर तो त्या ब्राह्मणाला म्हणाला, "द्विजश्रेष्ठा; तुझ्या जपाच्या प्रभावाने देव प्रसन्न होऊन तुला वर देण्यासाठी इथे आले आहेत. जर तुझी त्यांच्याकडून वर घेण्याची इच्छा नसेल तर तू माझ्यापासून पाहिजे तो वर मागून घे!"

असे त्या राजाचे शब्द ऐकून तो ब्राह्मण हसला आणि राजाला म्हणाला, "अरे वेड्या, सर्व समर्थ असे जे देव त्यांच्यापासून सुद्धा वर मागण्याची माझी इच्छा नाही. तेव्हा मी तुला काय मागणार आणि तू मला काय देणार?" तेव्हा राजा त्याला म्हणाला, "मी जर तुला, तू समजतोस त्याप्रमाणे वर देण्यास असमर्थ असलो तर मग तूच मला योग्य असा वर का देत नाहीस?" असे राजाचे शब्द ऐकून तो ब्राह्मण म्हणाला, "ठीक आहे, तुला पाहिजे ते तू मला माग. तुझी ती इच्छापूर्ती मी आताच करतो!"

तेव्हा राजाच्या मनात विचार आला, 'खरं म्हणजे मी योग्य अशी एखादी वस्तू या ब्राह्मणास अर्पण करावी व त्याने तिचा स्वीकार करावा हेच योग्य आहे. पण या ब्राह्मणाने काही देऊ करावे व मी त्याचा स्वीकार करावा हे तसे अयोग्यच नाही का!' असा तो राजा विचार करीत आहे तितक्यात दोन ब्राह्मण मोठ-मोठ्यांदा भांडत तिथे आले. त्यांनी राजाला तिथे पहाताच

त्यांना फार आनंद झाला. कारण त्यांच्या भांडणाबद्दल न्याय देणारा तोच होता. तेव्हा त्या ब्राह्मणांनी आपापले गाऱ्हाणे राजाला सांगण्यास सुरुवात केली. त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, "महाराज, या ब्राह्मणाने मला दक्षिणेसह एक गाय दान दिली व मी तिचा स्वीकार केला. परंतु आता मी तीच गाय याला दान देत असताना हा तिचा स्वीकार का करत नाही ?" असे त्या ब्राह्मणाचे गाऱ्हाणे संपल्यावर दुसरा ब्राह्मण म्हणाला, "महाराज, मी आजपर्यंत कधीही दिलेले दान परत घेतले नाही. मला गाय पाहिजे म्हणून मी याला विनंतीही केलेली नाही, तेव्हा ती गाय हा मला बळेच का देत आहे ?"

असे त्या दोघा ब्राह्मणांचे गाऱ्हाणे ऐकूण राजा म्हणाला, "एकदा गायीच्या दानाचा स्वीकार केल्यानंतर पुन्हा तीच गाय ज्याने दिली त्याला ती परत घे असं म्हणणे योग्य नाही !" जे काय चालले आहे ते पहात व ऐकत इंद्रादि देव त्या ठिकाणी उपस्थित होतेच. राजा पुढे काही बोलणार तोच इंद्र त्याला म्हणाला, "राजन्, हा न्याय जर तुला ज्ञात आहे तर या जप करणाऱ्या ब्राह्मणापासून तू वर का मागून घेत नाहीस ?" असे इंद्राचे चतुर बोलणे ऐकून राजाला पुढे काही बोलताच आले नाही. त्याने त्या ब्राह्मणापासून वर म्हणून आजपर्यंतच्या त्याच्या जपाचे अर्धे फळ मागून घेतले. त्या उदार व निःस्पृह ब्राह्मणानेही ते त्याला दिले. त्या पुण्यामुळे राजाला स्वर्गलोक प्राप्त झाला.

पुढे त्या ब्राह्मणालाही शिवलोक प्राप्त झाला. तेथे तो खूप वर्षे राहिला. जेव्हा तो पुन्हा भूलोकी आला तेव्हा त्याला स्वतंत्रता व योगसिद्धी यांचा लाभ झाला.

क्र. .२९८२ ३१।३।९८
विषय कथा ८९

# बुद्धीचे बळ

फार वर्षापूर्वी कोण्या एका नगरात एक व्यापारी राहात होता. व्यापारात त्याने आपल्या अंगाच्या हुशारीने खूप द्रव्य मिळवून तो श्रीमंत झाला होता. एके दिवशी तो व्यापाराकरिता मथुरा नगरीत जाऊ लागला. हा प्रवास तो बैलगाडीतून करीत होता. त्या गाडीत गाडीवान आणि तो व्यापारी याशिवाय बराच माल भरलेला होता. गाडीमार्गक्रमण करीत असताना ओझ्यामुळे त्या बैलगाडीचा जू मोडला. त्यामुळे संजीवक नावाचा एक बैल तेथे असलेल्या ओलसर जमिनीवर पाय घसरून खाली पडला. त्याला खूपच मार लागल्यामुळे तो मूर्च्छित झाला. तेव्हा गाडीवानाने व व्यापाऱ्याने त्या बैलाला सावध करण्याचा खूप प्रयत्न केला पण त्याचा काही उपयोग झाला नाही. अखेर तो व्यापारी मोठ्या निराशेने गाडीवानाच्या मदतीने आपला सर्व माल गोळा करून तेथून निघून गेला.

संजीवक बैलाच्या आयुष्याची दोरी बळकट तसेच त्याचे दैवही चांगले ! त्यामुळे थोड्या वेळाने तो शुद्धीवर आला. नंतर हळूहळू उठून तो त्या ठिकाणी सर्वत्र असलेले कोवळे गवत खाऊ लागला. तेव्हा त्याला बरीच हुशारी वाटली. नंतर तो तेथून यमुना नदीच्या काठी असलेल्या हिरव्यागार रानात गेला आणि तेथेच तो राहू लागला. तिथे हिरवागार चारा भरपूर असल्यामुळे संजीवक चांगलाच पोसला गेला. व शक्तिमान झाला. तो आता शंकराच्या नंदीप्रमाणे दिसू लागला. तो आपल्या शिंगांनी नदीकाठची माती उधळत मोठमोठ्या डुरकण्या देऊ लागला. त्या सर्व रानाचे आता आपणच राजे आहोत असे त्याला वाटू लागले.

त्यावेळी त्या रानापासून जवळच असलेल्या एका अरण्यात पिंगलक नावाचा एक सिंह राहात होता. तो अतिशय मोठा व शक्तिमान असल्याने त्याने आपल्या पराक्रमाने ते अरण्य आपल्या स्वाधीनच केले होते. तो त्या

अरण्याचा राजाच होता. त्याचे मंत्री दोन कोल्हे होते. त्यापैकी एकाचे नाव होते दमनक व दुसऱ्याचेनाव होते करटक. दमनक व करटक हे दोघेही फार धूर्त होते.

एकदा काय झाले पिंगलक नेहमीप्रमाणे पाणी पिण्याकरिता यमुनेच्या काठाकडे चालला होता, त्यावेळी संजीवक बैलाने मोठ्याने मारलेली डरकाळी त्याच्या कानावर पडली. सर्व दिशा दुमदुमून टाकणारा, यापूर्वी कधीही कानी न पडलेला असा तो भयंकर आवाज ऐकून पिंगलक जरी निर्भय होता तरी सुद्धा तो चांगलाच घाबरला. त्याच्या मनात विचार आला, "माझ्या गर्जनेपेक्षाही जास्त भयंकर असा हा आवाज कोणत्या प्राण्याचा असावा? त्याच्या आवाजावरून तो खूपच शक्तिमान असला पाहिजे. त्याने जर मला पाहिले तर तो मला या अरण्यातून खचितच हाकलून देईल किंवा कदाचित ठारही मारील." अशा विचाराने भयग्रस्त झालेला पिंगलक नदीकडे जाऊन पाणी न पिताच आपल्या अरण्यात परत गेला. आपल्याला वाटत असलेली भीती आपल्या मंत्र्यांच्या लक्षात येऊ नये म्हणून तो आपली मुद्रा निर्विकार करून एक झाडाखाली जाऊन निवांत बसला.

पण राजाचा मंत्री दमनक हा फार शहाणा मंत्री होता. तो करटकाला म्हणाला, 'आपले महाराज तहान लागली म्हणून पाणी पिण्याकरिता नदीकडे गेले होते पण ते पाणी न पिताच सत्वर परत का आले? त्याला काही तरी कारण असावे. ते कोणते ते आपण त्यांना विचारावं असं मला वाटतं.' तेव्हा करटक म्हणाला, "महाराजांच्या मनात काय आहे, त्याच्याशी आपल्याला काय कर्तव्य आहे? तसं त्यांना विचारणं म्हणजे विनाकारण त्यांचा राग आपल्यावर ओढवून घेणं." असे करटकाचे बोलणे ऐकून दमनक म्हणाला, "महाराजांबरोबर फक्त आपण आपला उदरनिर्वाह करावा एवढेच काही आपलं कर्तव्य नाही. वेळप्रसंगी आपणही महाराजांच्या मनातील काही गोष्टी जाणून घेण्याचा प्रयत्न करून त्या कामी त्यांना मदतही करण्याचा प्रयत्न केला पाहिजे!"

तेव्हा करटक म्हणाला, "तशा वागण्याने आपणाकडून महाराजांची अमर्यादा नाही का होणार? तो सेवकाचा मुळीच धर्म नाही." असे करटकाचे

शब्द ऐकून बुद्धिमान दमनक स्वस्थ बसला नाही. तो म्हणाला, "करटका, असं तू बोलणं योग्य नव्हे. प्रत्येक प्राणी आपल्या योग्यतेप्रमाणं फळाची इच्छा करीत असतो. हे तुला माहीत नाही का ? कुत्रा एक हाड प्राप्त झाले की खूष होतो. आणि सिंह हत्ती दिसला की त्याच्या अंगावर धावतो." ते ऐकून करटक म्हणाला, 'समज आपण महाराजांकडे गेलो. त्यांना पाणी न पिण्याचे विचारले. तेव्हा ते जर आपल्यावर रागावले तर त्यात आपला कोणता फायदा आहे ? वेळप्रसंगी आपल्या प्राणावरही बेतेल कारण मोठ्या लोकांच्या लहरी वागण्याविषयी काहीच सांगता येत नाही." अशा करटकाच्या बोलण्यावर दमनक म्हणाला, "हे तुझं बोलणं खरंच आहे. पण जो शहाणा असतो तो योग्य वेळ पाहूनच आपल्या धन्याच्या मनात मोठ्या चातुर्याने प्रवेश करून त्याला आपलासा करून घेतो."

असे दमनकाचे आग्रही बोलणे ऐकून करटक त्याला म्हणाला, "ठीक आहे, दमनका, तुला जे योग्य दिलेल तसं तू कर !" नंतर दमनक पिंगलकाकडे गेला आणि त्याला मोठ्या नम्रतेने नमस्कार करून तो म्हणाला, 'महाराज, मी आपला वंशपरंपरागत हितकर्ता व नम्र सेवक आहे. हितकारक असा एखादा परका प्राणीही जवळ बाळगणं योग्य असतं आणि अहित करणारा आपला एखादा नातलगही त्याज्य असतो. एखादे मांजर विकत घेऊन ते हितकर्ते असते म्हणून घरात बाळगतात आणि आपल्याच घरात जन्मलेल्या पण आपले अहित करणाऱ्या उंदरांना ठार मारवितात. म्हणून हितकर्त्या सेवकांचे म्हणणे ऐश्वर्याची इच्छा करणाऱ्या धन्याने वेळप्रसंगी ऐकावे. धन्याने आज्ञा केलेली नसली तरी सेवकाने प्रसंगी धन्याचे हित करावे अशी नीती आहे. म्हणून महाराज, मी जर आपल्या विश्वासास पात्र असेन, आपण जर माझ्यावर रागावणार नसाल तर आपल्याला काही विचारावं असं माझ्या मनात आहे. आपणांस जर राग येणार असेल तर काहीच न बोलता मी येथे स्वस्थ बसून राहातो."

असे दमनकाचे नम्र व चतुर शब्द ऐकून पिंगलक त्याला म्हणाला, "दमनका, तू माझा विश्वासू मंत्री आहेस. तुझ्या मनात काय आहे ते तू मला निःसंकोचपणे विचार. त्याबद्दल मी तुझ्यावर मुळीच रागवणार नाही." अशा

पिंगलकाच्या आश्वासनपर शब्दांनी दमनकास धीर आला आणि तो म्हणाला, 'महाराज, तहानेने व्याकुळ होऊन आपण पाणी पिण्याकरिता नदीकडे गेला होता पण ते न पिताच इथे परत येऊन तुम्ही असे उद्विग्न मुद्रेने का बसलात ?'' आपल्या विश्वासू मंत्र्यांचा हा प्रश्न ऐकून सिंह आपल्या मनात म्हणाला, ''दमनका फार धूर्त व चतुर आहे. त्याने बरोबर ओळखलं आहे. तेव्हा त्याच्या पासून आपल्या मनातील भीती आता लपवून ठेवण्यात काय अर्थ आहे ?'' अशा विचाराने तो म्हणाला, ''दमनका, तसं तुला न सांगण्यासारखं असं काहीच नाही. तुला ऐकायचं असेल तर सांगतो. ऐक.''

''थोड्या वेळापूर्वी मी पाणी पिण्यासाठी नदीकडे गेलो त्या वेळी एक भयंकर आवाज माझ्या कानी पडला. तो आवाज माझ्या पेक्षा फार शक्तिमान अशा एखाद्या प्राण्याचा असावा असं मला वाटतं. आवाजावरून तो प्राणी फारच बलाढ्य असावा अशी मला खात्री वाटते. तो प्राणी जर अरण्यात आला तर तो मला मारून टाकील. तेव्हा आता इथे न राहता दूरच्या एखाद्या अरण्याकडे निघून जावे असे माझ्या मनात विचार येत आहेत'' असे आपल्या पराक्रमी धन्याचे दुबळे शब्द ऐकून दमनक म्हणाला, ''महाराज, आपण एवढे पराक्रमी, शूर व बलाढ्य असे असताना एवढ्या क्षुल्लक कारणासाठी आपले वस्तीस्थान सोडून जाण्याचा विचार करता हे योग्य नाही. आपणास माहीत नसेल तर सांगतो. पाण्याच्या जोरदार प्रवाहाने बांध फुटतो. चाहाडखोर स्वभावाने मैत्री कमी होते; गुप्त न ठेवल्यास मंत्र निष्फळ होतो आणि जो भित्रा असतो तो नुसत्या आवाजानेच घाबरतो. महाराज, आपणा सारखे पराक्रमी केवळ आवाजाला घाबरत नाहीत. आपली आज्ञा असेल तर तो आवाज कोणाचा, कोणी केला त्याचा शोध घेण्यासाठी मी जातो.''

असे दमनकाचे बोलणे ऐकून पिंगलक बसल्या जागेवरूनच त्याला म्हणाला, ''त्या अज्ञात भयंकर अशा महाप्राण्यासमोर जाण्याचे धैर्य आणि सामर्थ्य तुझ्या अंगी असेल तर तू बेलाशक जा!'' नंतर दमनक हळू हळू यमुनेच्या तीराकडे गेला. तिथं थोडा वेळ थांबून तो ज्या दिशेने संजीवकाच्या ओरडण्याचा आवाज ऐकू येत होता तिकडे सावकाश जाऊ लागला. काही अंतर चालून गेल्यावर गवत खाणारा एक मस्त बैल त्याच्या नजरेस पडला.

अधून मधून तो डरकाळी फोडीत होता.मग दमनक मोठ्या धिटाईने त्या बैलाकडे गेला आणि त्याने त्याचे नाव विचारून त्याच्याशी मैत्री संपादन केली.

नंतर काही वेळाने तो पिंगलकाकडे परत आला आणि त्याला घडलेली सर्व हकीकत सांगितली, ती ऐकून पिंगलक त्याला म्हणाला, ''दमनका, जर तू त्या महाबलाढ्य बैलाला स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले आहेस, त्याच्याशी मैत्री केली आहेस तर काही तरी युक्त योजून त्याला तू येथे आणलेस तर फार बरे होईल. तो कसा आहे ते मला तरी बघायला मिळेल.'' असे म्हणून अतिशय आनंदित झालेल्या पिंगलकाने दमनकाला पुन्हा संजीवकाकडे जाण्याची आज्ञा केली.

त्याप्रमाणे दमनक पुन्हा संजीवकाकडे गेला आणि त्याला म्हणाला, ''वृषभराज, आमच्या वनराज महाराजांनी तुला भेटावयास माझ्या बरोबर आमंत्रण दिले आहे. तेव्हा तू त्यांच्याकडे चल.'' असे दमनकाचे शब्द ऐकून सिंहाकडे जाण्यास संजीवकाला भीती वाटू लागली. पण दमनकाने त्याची समजूत घालून त्याच्या जीविताची हमी घेऊन त्याला पिंगलकाकडे नेले. पिंगलकाच्या समोर जाताच संजीवकाने त्याला प्रणाम केला. तेव्हा पिंगलक त्याला म्हणाला, ''वृषभराज, तू आता माझा मित्र झाला आहेस, तेव्हा कसलीही भीती न बाळगता तू माझ्या बरोबर या अरण्यातच रहा !'' तेव्हा 'ठीक आहे' असे म्हणून संजीवक पिंगलकाजवळ राहू लागला.

पुढे त्या गुणवान बैलाच्या पराक्रमावर पिंगलक खूष झाला आणि तो नेहमीच संजीवक सांगेल त्याप्रमाणे वागू लागला. त्यामुळे पिंगलकाचे अन्य सेवक मोठे नाराज झाले. दमनक आणि करटक यांनाही मोठा विषाद वाटला. तेव्हा दमनक करटकाला म्हणाला, ''त्या बैलाने आपल्या धन्याला चांगलेच आपल्या स्वाधीन करून घेतले आहे. त्यामुळे आपल्या महाराजांचे आपल्याकडे दुर्लक्षच झाले आहे. सहजपणे मिळणाऱ्या आपल्या उदरनिर्वाहाचीही मोठी गैरसोय झाली आहे. बैल सांगेल त्याप्रमाणे आता आपले पराक्रमी महाराज वागू लागले आहेत. एवढे मठ्ठ ते कसे झाले ? पण हे सर्व माझ्यामुळेच झालं आहे. तेव्हा खरा अपराधी मीच आहे. त्या बैलाला मी इथे आणलं हीच माझी

घोडचूक झाली. तेव्हा आता अशी एखादी युक्ती योजली पाहिजे की जेणे करून संजीवकाचा नाश होईल म्हणजे आपले महाराज आपोआपच त्याच्या संगतीतून सुटतील.''

स्वतःच्या कृत्याबद्दल पश्चात्ताप झालेल्या दमनकाचे असे बोलणे ऐकून करटक त्याला म्हणाला, ''दमनका, तुला जे वाटतं तसं आता घडवून आणणं अशक्य!'' ''का बरं?'' दमनक म्हणाला, ''मी आपल्या बुद्धिसामर्थ्यानं तसं खात्रीने करून दाखवीन. आपत्तीच्या वेळी ज्याची बुद्धी कुंठित होत नाही तो प्राणी काय हवे ते इष्टकार्य घडवून आणू शकतो. याबद्दल मी तुला बगळा व खेकडा यांची एक गोष्ट सांगतो ती तू ऐक''-

''कोण्या एका रानात एक सरोवर होते. त्यात खूप मासे होते. त्या सरोवराजवळच एक बगळा राहत होता. त्याला पाहून भीतीने एकही मासा पाण्यावर येत नसे. बगळा दिसला रे दिसला की ते पळून जात. तेव्हा विचार करून त्याने एक युक्ती योजली. एके दिवशी तो माशांना ऐकू जाईल अशा मोठ्या आवाजात म्हणाला, 'थोड्या वेळापूर्वी एक भयंकर कोळी आपले मोठे जाळे घेऊन इथे येऊन तुम्हाला पाहून गेला. तो पुन्हा इथे लवकरच येईल. आणि तुम्हा सर्वांना आपल्या जाळ्यात पकडून मारून टाकील. तेव्हा तुमचा जर माझ्यावर विश्वास असेल तर मी सांगतो तसं करा म्हणजे तुम्ही सर्वजण सुरक्षित रहाल. इथून जवळच दुसरे एक स्वच्छ पाण्याचे सरोवर आहे. ते त्या कोळ्याला माहीत नाही. मी तुमच्यापैकी एकेकाला त्या सरोवरात नेऊन सोडतो.' असे त्या धूर्त बगळ्याचे शब्द ऐकून ते मूर्ख मासे भयग्रस्त झाले. त्यांनी कसलाही विचार न करता त्या बगळ्यावर पूर्ण विश्वास ठेवला आणि त्याचे म्हणणे मान्य केले. नंतर तो बगळा त्या सरोवरातील एकेक माशाला आपल्या चोचीत घेऊन काही अंतरावर असलेल्या एका मोठ्या शिळेकडे जाई व तेथे तो त्या माशाला खाऊन टाकी. अशा प्रकारे त्याने खूप माशांना मारून खाऊन टाकले.

एके दिवशी त्या सरोवरात राहणारा एक खेकडा त्या बगळ्याला म्हणाला, 'इथे राहणाऱ्या माशांना तू दररोज कुठे घेऊन जातोस?' 'तेव्हा त्या

धूर्त बगळ्याने जे माशांना सांगितले होते अगदी तसेच त्याने त्या खेकड्याला सांगितले. ते ऐकून खेकड्यालाही आपल्या जीवाच्या सुरक्षिततेबद्दल भीती वाटून तो बगळ्याला म्हणाला, 'कृपा करून माशाप्रमाणे मलाही तू त्या सरोवराकडे घेऊन चल.' तेव्हा मासे खाऊन कंटाळलेल्या बगळ्याला आता आपणास खेकडा खायला मिळणार म्हणून मोठा आनंद झाला. त्या आनंदाच्या भरात तो खेकड्याला आपल्या चोचीत धरून त्याला मारण्यासाठी शिळेपाशी घेऊन गेला. तेव्हा तेथे सर्वत्र पडलेली माशांची हाडे पाहून खेकड्याने बगळ्याचा कपटीपणा ओळखला व तो खेकडा बुद्धिमान असल्याने आता हा बगळा आपल्याला ठार मारणार असे जाणून त्याने लगेच त्या बगळ्याची मान आपल्या तीक्ष्ण दातांनी तोडली आणि त्याला मारून टाकले.

नंतर सावकाश चालत चालत तो आपल्या सरोवराकडे गेला आणि त्याने घडलेली सर्व हकीकत तेथे उरलेल्या माशांना सांगितली. तेव्हा त्यांनी आपले प्राण वाचविणाऱ्या खेकड्याला धन्यवाद दिले." अशी गोष्ट सांगून दमनक. करटकाला म्हणाला, "अरे, बुध्दी हेच सामर्थ्य आहे. ज्याला बुध्दी नाही, तो बलवंत असला तरी त्याचा काय उपयोग ?" असे दमनकाचे बोलणे ऐकून करटक काही बोलला नाही. तेव्हा धूर्त दमनक फार खिन्न होऊन पिंगलकाकडे गेला. पिंगलकाने त्याला त्याच्या खिन्नतेचे कारण विचारले. तेव्हा तो मोठ्या काळजीयुक्त स्वरात म्हणाला, "महाराज, एखादी वाईट वार्ता कानी पडल्यावर स्वस्थ बसणं योग्य नाही. आपल्या धन्याचे कल्याण व्हावे अशी इच्छा असलेल्या कोण्याही सेवकाने धन्याने न विचारताही जे आपणास कळले ते त्याच्या कानावर घालावे, अशी नीती आहे. म्हणून महाराज, माझ्याबद्दल मुळीच गैरसमज करून न घेता मी आपणास काय सांगतो ते कृपा करून ऐका." असे म्हणून दमनक क्षणभर थांबला.

नंतर दुसऱ्या क्षणी तो म्हणाला, "महाराज, संजीवक तुम्हाला ठार मारून स्वतः राजा होण्याचे कारस्थान करीत आहे. तुम्ही भित्रे आहात अशी त्याची खात्री झाली आहे. तो आपली शस्त्रे म्हणजे त्याची दोन्ही खूर शिंगे एकसारखी हलवीत असतो. तो वनातल्या प्रत्येक प्राण्याला सांगत असतो की गवत चारा खाणारा मी अहिंसक आहे. मी राजा झालो तर माझ्या राज्यात

तुम्ही मोठ्या सुखाने राहाल. तेव्हा आपण एकजुटीने नेहमीच हिंसा करणाऱ्या त्या पिंगलक सिंहाला मारून टाकू! म्हणून संजीवकाबद्दल आपण शक्यतो लवकर विचार करा नाहीतर त्याच्यापासून अपाय होण्याचाच नव्हे तर एखादे वेळी जीव गमावण्याचाही संभव आहे."

असे खोटेनाटेच दमनकाने पिंगलकाला सांगितले. तेव्हा पिंगलक म्हणाला, "अरे, तो मूर्ख बैल गवत खाणारा, तो माझं काय वाईट करणार ? तो आता माझ्या आश्रयाला आला आहे. माझा मित्रही झाला आहे. तेव्हा मी त्याला ठार मारणे योग्य आहे का ?" असे पिंगलकाचे शब्द ऐकून दमनक मोठ्या नम्रतेने म्हणाला, "संजीवक स्वतःला आपल्या बरोबरीचा समजतो. तेव्हा तो राज्याचा लोभ करणारच. पण अखेर राजेपद एकालाच मिळते. आपण म्हणता, संजीवक आपला मित्र पण तो तर तुमचा विश्वासघात करायला निघाला आहे. म्हणून त्याचा काही तरी बंदोबस्त म्हणजे त्याला मारून टाकणेच योग्य. खरं सांगू, मला तर असं वाटतं की संजीवकाची मैत्री अखेर आपल्या अकल्याणाला कारणीभूत होईल. मला जे आपणास सांगणे आवश्यक वाटले ते मी सांगितले. माझ्या सांगण्यावर आपला विश्वास बसत नसेल तर आपली तीक्ष्ण शिंगे मोठ्या डौलाने, मोठ्या गर्वाने खालीवर करीत तुमच्यापाशी येणाऱ्या संजीवकाला पाहिल्यावर माझ्या म्हणण्याचा तुम्हाला अनुभव येईल."

अशा रीतीने दमनकाने संजीवकाबद्दल पिंगलकाचे मन कलुषित केले. त्यामुळे आपल्या विरुद्ध कारस्थान करणाऱ्या संजीवकाला मारून टाकावे असे पिंगलकाला वाटू लागले. आता आपले काम फत्ते झाले, पिंगलक एखादे दिवशी संजीवकाला मारणार अशी खात्री पटून दमनकाला समाधान वाटले पण तसे न दिसू देता तो आपल्या मुद्रेवर खिन्नताच ठेवून हळूहळू संजीवकाकडे गेला. तेव्हा त्याची खिन्न मुद्रा पाहून संजीवकाने त्याला विचारले, "दमनका, तुझी प्रकृति बरी नाही काय ? तू असा खिन्न का दिसतोस ?" तेव्हा धूर्त दमनक म्हणाला, "राजा लहरी असतो. त्याला नेहमी प्रिय असं कोण असणार ?"

असे दमनकाचे बोलणे संजीवकाला समजलेच नाही. त्याने पुन्हा विचारले, "मित्रा, तुझ्या खिन्नतेचे कारण मला सांगणार नाहीस का ?" तेव्हा दमनक म्हणाला, "संजीवका, तुझ्याबद्दल मला फार स्नेह वाटतो. म्हणूनच मी

तुला एक महत्त्वाची गोष्ट सांगायला आलो आहे. वनराज पिंगलक आपल्या मनात तुझ्याविषयी दुष्ट इच्छा बाळगून आहे. तो हिंसा करणारा म्हणून त्याची मैत्री चंचलच आहे. मला असं वाटतं की वाघ, चित्ता वगैरे जे त्याचे हिंसक दोस्त आहेत, त्यांच्याकडून तुला मारून खाऊन टाकावं असा त्याला सल्ला मिळत असावा.''

अशा प्रकारे त्या लबाड कोल्ह्याने पिंगलकाबद्दलही संजीवकाचे मन कलुषित केले. दमनकाचे शब्द ऐकून संजीवकाला प्रथम मोठे आश्चर्य वाटले आणि नंतर पिंगलकाचा धूर्त कावा कळून त्याला खूप वाईट वाटले. तो म्हणाला, ''मला वाटतं, कोणीतरी चहाडखोराने मुद्दाम आमच्यात वैर उत्पन्न व्हावे म्हणून हे कारस्थान केले असावे. राजा एकाकी माझ्यावर एवढा रागावण्याला तसे काहीच झालेले नाही. असो; दैवात जे असेल ते घडेल!'' असे संजीवकाचे शब्द ऐकून दमनक म्हणाला, ''अरे संजीवका, धीर धर. धैर्याने सर्व साध्य होते. आता मी सांगतो तसं तू कर. पिंगलक तुला ठार मारणारच. जेव्हा तो आपली शेपटी वर उचलून चारी पायावर एकदम उभा राहील तेव्हा तो तुझ्यावर हल्ला करण्याचा विचार करीत आहे असे तू समज. त्यावेळी तूही सावध राहून आपले डोके खाली झुकवून दोन्ही तीक्ष्ण शिंगे पिंगलकाच्या पोटात खुपसून त्याला मारून टाक.''

असे संजीवकाला सांगून दमनक करटकाकडे गेला. आणि त्याने पिंगलक व संजीवक यांच्यात आपण कसे वैर निर्माण केले ती सर्व हकीकत त्याला सांगितली. नंतर काही वेळाने संजीवक पिंगलकाचे विचार व वागणे जाणून घेण्याच्या हेतूने हळूहळू त्याच्याकडे गेला. तेव्हा आपली शेपटी उचलून व चारी पायावर उभे राहून सिंह आपल्यावर हल्ला करण्याचा विचार करत आहे असे त्याला दिसले. त्याचवेळी भीतीने मस्तक हलवीत असलेल्या बैलाला सिंहाने पाहिले. तेव्हा एका क्षणाचाही विलंब न लावता त्याने बैलाच्या अंगावर उडी घेतली व त्याच्या पाठीवर आपल्या पंज्याचा जोराने आघात केला. बैलानेही आपल्या शिंगांनी सिंहाला जर्जर केले. अशा रीतीने सिंह व बैल यांची झुंज सुरू झाली.

ती झुंज पाहून सरळ स्वभावाचा करटक दमनकास म्हणाला, "आपला स्वार्थ साधण्याकरिता तू आपल्या धन्यावर केवढे मोठे प्राणांतिक संकट आणलेस!" असे करटकाचे बोलणे ऐकून दमनक हसत म्हणाला, "अरे, सिंह आणि बैल यांच्या झुंजीत कोण विजयी होणार हे काय सांगायला पाहिजे! माजलेल्या हत्तींची गंडस्थळे फोडणारा पराक्रमी सिंह कुठे आणि निःसत्व गवत खाऊन पाठीवर चाबकांचे वळ मिरविणारा बैल कुठे!"

असे दमनक व करटक आपापसात बोलत आहेत तोच तिकडे चाललेल्या झुंजीत पिंगलक सिंहाने संजीवक बैलाला ठार मारले. आपल्या शत्रूचा निकाल लागला असे पाहून दमनक करटकासह वनराज पिंगलकाकडे गेला. तेव्हा इतके दिवस संजीवकाने त्याच्या पासून हिरावून घेतलेले मंत्रीपद पुन्हा त्याला पिंगलकाकडून प्राप्त झाले. नंतर तो करटकासह पिंगलकापाशी बरीच वर्षे मोठ्या सुखासमाधानाने राहिला.

# दुर्जनांची फजिती

पवित्र गंगानदीच्या तीरावर कुसुमपुर नावाचे एक गांव होते. त्या नगरात हरस्वामी नावाचा एक धर्मशील तापसी राहत होता. तपश्चर्या करण्यासाठी म्हणून त्याने नगरापासून जवळच असलेल्या नदीकाठच्या एका निवांत जागी आपली पर्णकुटी बांधली होती. त्या पर्णकुटीत तो दिवसाचा बराच वेळ रोजची स्नानाची धार्मिक कृत्ये झाल्यावर तो भिक्षेकरिता नगरात जाई आणि चार घरी भिक्षा मागून जी भिक्षा मिळे तिच्यावर तो आपला उदरनिर्वाह करी. असा तो तापसी आपल्या तपाचरणामुळे लोकांच्या आदरास व स्तुतीस पात्र झाला होता.

त्या सदाचरणी व सद्गुणी तापसाचा अकारण मत्सर करणारे व त्याची विनाकारण निंदा करणारे काही दुष्ट लोक त्या नगरात होते. एके दिवशी त्यांच्यापैकी एक लोकांना सांगू लागला; 'अहो, तपाचं ढोंग करणारा तो तापसी फार दुष्ट आहे, हे ठाऊक आहे का तुम्हाला ? फार भयंकर आहे तो ! अहो, त्या दुष्टानं आपल्या नगरातल्या सर्व मुलांना मारून खाऊन टाकलं आहे !'

असे त्या मत्सरी माणसाचे बोलणे संपताच तेथे असलेला तसल्याच स्वभावाचा दुसरा माणूस म्हणाला, 'अहो, माझ्या कानावर सुद्धा ती गोष्ट आली आहे, समजलं !' त्याच वेळी तिथे आलेला तिसरा माणूस म्हणाला, 'अगदी खरं म्हणजे खरंच आहे ते !' अशा प्रकारच्या दुष्ट मनोवृत्तीच्या माणसांच्या बोलण्याने श्रेष्ठ माणसाच्या निंदेस आरंभ होतो. पराचा कावळा होण्यास विलंब लागत नाही. हळू हळू तापसाबद्दलचा दुष्ट प्रवाद सर्व नगरभर पसरला.

त्यामुळे नागरिक आपल्या मुलांना घराबाहेर जाऊ देईनासे झाले. हरस्वामी मुलांना खातो त्या कारणाने आपला वंशक्षय होईल अशी लोकांना भीती वाटू लागली. तेव्हा त्यांनी एकत्र जमून असा विचार केला की हरस्वामीची ताबडतोब नगरातून हकालपट्टी करावी. असा एकमुखाने संमत झालेला ठराव समक्ष हरस्वामीला जाऊन सांगण्याचे धैर्य लोकांना होईना. त्यांना वाटले आपण जर त्याच्यापुढे गेलो आणि सांगू लागलो तर कदाचित संतापून तो आपणास खाऊन टाकील. म्हणून त्यांनी हरस्वामीकडे आपले दूत पाठविले.

ते दूत हरस्वामीच्या पर्णकुटीकडे गेले. आणि पर्णकुटीपासून दूर सुरक्षित अंतरावर उभे राहून ते मोठ्यांदा म्हणाले, 'हरस्वामी, हरस्वामी, तू सत्वर या नगरातून चालता हो. अशी आम्हा समस्त नागरिकांची तुला आज्ञा आहे !' असे त्या दूतांचे शब्द कानी पडताच हरस्वामी पर्णकुटीबाहेर आला. त्याने दूतांना विचारले, "का बरं ? असं कोणतं दुष्कृत्य माझ्या हातून घडलं ?" "तू दुष्ट आहेस. मुलांना खातोस अशी लोकांची समजूत झाली आहे !"

असे त्या दूतांचे शब्द ऐकताच 'अस्सं !' असा आश्चर्योद्गार काढून हरस्वामी त्यांना म्हणाला, 'असं आहे तर लोकांच्या मनातील संशय व भीती नाहीशी करण्यास मी तुमच्या बरोबर येतो. चला !' असे म्हणून पुढे धावतच वाटचाल करणाऱ्या त्या दूतांच्या मागून सावकाश चालत येणारा धीरगंभीर हरस्वामी नगराच्या वेशीजवळ आला. तेव्हा त्याला पाहून भ्यालेले नागरिक चटकन् आपआपल्या घरावर चढून बसले. एखाद्या माणसाबद्दल मन कलुषित झाले म्हणजे त्याचे सत्कृत्यही दुष्कृत्य वाटू लागते.

या न्यायाने विचारशक्ति नष्ट झालेल्या लोकांचा मूर्खपणा पाहून हरस्वामीला हसू आले. तो रस्त्यातच थांबून मोठ्यांदा म्हणाला, 'खुळ्या माणसांनो, मला तुमच्या अविचाराची कीव येते. सांगा पाहू. मी आजपर्यंत कुणाकुणाची मुलं खाल्ली आहेत ते !' असे हरस्वामीचे निर्भीड शब्द ऐकून जे विचारी व अनुभवी नागरिक होते त्यांनी नगरात सर्वत्र चौकशी केली. तेव्हा कोणीही कोणाला खाल्लेले नसून सर्वांची मुले सुखरूप आहेत असे त्यांना कळले. नंतर सर्व नागरिकांना ते वृत्त कळताच आपण हरस्वामी सारख्या श्रेष्ठ व धर्मशील माणसावर अविचाराने खोटा आरोप केला म्हणून त्यांना पश्चात्ताप झाला. त्यांनी हरस्वामीची क्षमा मागितली. आपणाबद्दल लोकांच्या मनात असलेला किंतु नाहीसा झाला असे पाहून हरस्वामीने ते नगर सोडून जाण्याचे ठरविले. पण अखेर लोकांच्या आग्रही विनंतीला मान देऊन त्याला तिथंच राहावे लागले.

सदाचरणी सज्जनांचा उत्कर्ष ज्या दुर्जनांना सहन होत नाही ते त्यांच्यावर नेहमीच खोटा आरोप करून त्यांची सर्वत्र निंदा करण्याचा प्रयत्न करीत बसतात.

BVBK-0402982

२९८२ ३१/३/८०